रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २८६
www.ramprahar.com

रविवार, ४ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी



**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये झालेल्या पर्यटकांवरील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरूच आहे. भारताने पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण २०२३मध्ये एक नवीन परिच्छेद २.२० अ समाविष्ट केला, ज्यात पाकिस्तानमधून आयात करण्यावर बंदी असे म्हटले आहे. याबरोबरच पाकिस्तानी ध्वजधारी जहाजांना भारतीय बंदरात प्रवेश करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. दरम्यान, अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोन्काल्व्हेस लॉरेन्को यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी, दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे. दहशतवादी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध कठोर व निर्णायक कारवाई करण्यास भारत वचनबद्ध असल्याचे म्हटले आहे.

अंतरंग

ठिबक सिंचन पद्धती देतेय रोपांना संजीवनी/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

कोल्हापूरचा अमर कदम कुस्ती आखाड्यात अजिंक्य/८

# शासकीय योजना आदिवासींपर्यंत पोहचवा

■ मंत्री डॉ. अशोक उईके यांचे प्रतिपादन; संवाद मेळावा उत्साहात






**चौक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारची पीएम जनमन योजना आणि राज्यातील आभा योजना या दोन्ही योजनांद्वारे कातकरी समाजासह सर्व आदिवासी कुटुंबांना मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प केंद्र आणि राज्य सरकारने केला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, जेणेकरून १३ विभागांच्या विविध योजनांची माहिती व लाभ आदिवासी बंधू-भगिनींपर्यंत पोहचेल, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी शुक्रवारी (दि. २) केले.

खालापूर तालुक्यातील बोरगाव आंबेवाडी येथे आयोजित आदिवासी संवाद मेळाव्यात मंत्री डॉ. उईके बोलत होते. या मेळाव्याला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर अध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, तालुका मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, वासांबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णा पारंगे, ज्येष्ठ नेते विनोद भोईर, बोरगाव सरपंच प्रणिता मोरे, माजी सरपंच राजू मोरे, रामदास ठोंबरे, गणेश कदम, प्रितेश मोरे, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, रवी बांगरा यांच्यासह सरपंच, सदस्य, अधिकारी, कार्यकर्ते आणि आदिवासी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री डॉ. उईके पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएम जनमनसारख्या धोरणात्मक योजनांच्या माध्यमातून कातकरी व इतर आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. राज्य सरकारनेसुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आभा योजना जाहीर केली असून तिचा १०० दिवसांचा कृती आराखडा आखण्यात आला. या भागाचे आमदार महेश बालदी कार्यक्षम असून त्यांच्या आग्रहाखातर मी या ठिकाणी आपल्या समस्या ऐकण्यासाठी आलो आहे, असेही मंत्रीमहोदयांनी या वेळी नमूद केले.

प्रास्ताविक मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी केले. मेळाव्यापूर्वी मंत्रीमहोदयांनी स्थानिक आदिवासी समाजाशी संवाद साधून योजनांची अंमलबजावणी कशी होते याचा आढावा घेतला व समाधान व्यक्त करीत ही वाटचाल निश्चितच आदिवासी समाजाला समृद्धीकडे घेऊन जाणारी आहे, असे सांगितले.

### आरोग्यसेवा कक्षाचा लाभ घ्या -आमदार महेश बालदी

या वेळी आमदार महेश बालदी यांनी, या आदिवासी भागात येऊन समस्या ऐकून घेणारा आणि महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर आदिवासी मंत्रीमहोदयांना इथे आणणारा मी पहिला आमदार असल्याचे सांगून हशाचीपट्टीसह इतर आदिवासी बंधू-भगिनींसाठी मंजूर केलेल्या केलेल्या कामांची माहिती दिली. आदिवासींसाठी आपण आरोग्यसेवा कक्ष स्थापन केला असून त्याचा लाभ द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.



थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत पुण्यतिथी

## भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७व्या पुण्यतिथीनिमित्त ७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता उलवे नोडमध्ये विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. ३) पनवेल येथे पत्रकार परिषदेत दिली.

यामध्ये विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५चे बक्षीस वितरण; शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणीजनांचा सन्मान; त्याचबरोबर मराठी पाऊल पडते पुढे हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेला आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, भाजपचे नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, स्व. जनार्दन भगतसाहेबांनी अहोरात्र आपला देह बहुजन हिताय बहुजन सुखाय या तत्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्र्य व भुकेने हवालदिल लोकांबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामुळेच होऊ शकतो हे त्यांनी जाणले होते. दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी; त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या अंतःकरणात कायम होती. त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. **(पान २ वर..)**

### स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धेत चिंध्रण सर्वोत्कृष्ट

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, स्व. जनार्दन भगतसाहेबांनी केलेले कार्य सर्व समाजासाठी हितकारक होते. त्यांच्या कार्यातून या भूमीला सामाजिक, राजकीय ताकद मिळाली. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येत आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार अर्थात प्रथम क्रमांक चिंध्रण ग्रामपंचायतीने पटकाविला आहे. त्यांना एक लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

---

## निवडक

### गोव्यात यात्रेदरम्यान चेंगराचेंगरी; सात जणांचा मृत्यू; ५० जखमी

**पणजी :** गोव्यात शिरगाव येथील लईराई देवी मंदिरात धार्मिक यात्रेदरम्यान चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू, तर ५०हून अधिक लोक जखमी झाले आहेत. या घटनेनंतर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

### भिवंडीत एकाच कुटुंबातील चौघींचे मृतदेह आढळले

**ठाणे :** भिवंडीतील फेणे गावात एका घरामध्ये महिला व तिच्या तीन मुली असे चार जणींचे गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळले आहेत. महिलेचा पती शनिवारी (दि. ३) सकाळी कामावरून घरी परतल्यावर हा प्रकार उघडकीस आला. पोलीस तपास सुरू आहे.

## पनवेल रेल्वेस्थानकातील समस्या मार्गी लावाव्यात

### आमदार प्रशांत ठाकूर यांची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वेस्थानकाच्या विकासासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. मंत्री वैष्णव रेल्वेच्या महत्त्वपूर्ण स्थानकांना भेट देत असून त्यांनी शनिवारी (दि. ३) पनवेल स्टेशनला भेट दिली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंत्रीमहोदयांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत पनवेल रेल्वेस्थानकातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन उपाययोजना करण्याचीही विनंती केली.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल हे शहर रस्ते, परिवहन आणि रेल्वे वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि गतीशील केंद्र ठरले आहे. याची भौगोलिक व सामाजिक रचना लक्षात घेता पनवेल हे मुंबईचे प्रवेशद्वार मानणे उचित ठरेल. कोकण रेल्वे, मुंबई-नवी मुंबईकडे येण्या-जाणाऱ्या रेल्वेसेवा, पुणे मार्गावरील गाड्यांसाठी पनवेल एक अत्यंत महत्त्वाचे जंक्शन स्टेशन बनले आहे. याशिवाय पनवेलजवळील उलवे-द्रोणागिरी नोडमध्ये झपाट्याने होत असलेला विकास, **(पान २ वर..)**

## किल्ले रायगडावरील अतिक्रमणासंदर्भात नोटीस

**महाड : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगडावर अतिक्रमण कारवाईनंतर झालेल्या वादामुळे राज्यातील सर्वच गडकिल्ले अतिक्रमणमुक्त करण्याच्या मोहिमेंतर्गत किल्ले रायगडावरील २४ निवासी घरे व ५६ दुकानांना वनविभागाने नोटीस बजावली आहे. त्यासाठी ३० मेपर्यंत मुदत देण्यात आली आहे, पण यामध्ये रोप वेच्या कामांना मात्र एक प्रकारे क्लीन चीट देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

### रोप वेला क्लीन चीट

रायगड किल्ला व परिसर वनविभागाच्या अखत्यारित येतो, तर गडावरील वास्तू पुरातत्व विभागाच्या अधीन आहेत. गडावर रायगड रोप वेनेदेखील विविध प्रकारची कामे केली आहेत. यामध्ये रोप वे अप्पर स्टेशन, हॉटेल, निवासी व्यवस्था, जनरेटर रूम, स्वच्छतागृह यांचा समावेश आहे. यामधील किती कामांना शासनाने मंजुरी आहे हा प्रश्न अनुत्तरीत असताना रोप वेला मात्र क्लीन चीट देण्यात आली आहे.

---

## शेकाप युवा कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कामगार पक्षाच्या कोळखे येथील युवा कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि. ३) आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, भाजप तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, नांदगावचे सरपंच मनोहर भोईर, विद्याधर मोकल, दिनेश पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी शेकाप युवा कार्यकर्ते प्रितेश मुंढे, जयेंद्र मुंढे, अक्षय मुंढे, योगेश जाधव, अल्पेश मुंढे, वैभव भोईर, नितेश मुंढे यांनी भाजपमध्ये प्रवेश करीत विकासाचे ‘कमळ’ हाती घेतले.

(छाया : सुधीर नाझरे)



मुरुड : उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक येत आहेत.



# रोह्यात कर्मचारीवर्ग आक्रमक

## नगर परिषद अभियंता मारहाणप्रकरणी कारवाईची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

१ मेच्या पहाटे एक वाजताच्या सुमारास रोहा अष्टमी नगर परिषदेचे अभियंता ओंकार भुरण दमखाडी येथे काम करत असताना त्यांच्यावर जीवघेणी हल्ला झाला होता. या हल्ल्याच्या निषेधार्थ नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी रोहा नगर परिषद कार्यालय ते रोहा पोलीस ठाणे असा निषेध मोर्चा काढला.



या वेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, मुन्सिपल एम्प्लॉईज युनियन चे कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्या उपस्थितीत काढण्यात आलेल्या मोर्चेत अभियंता सुधीर भगत, स्वप्निल तोडणकर, विशाल काळे, युनियनचे रवींद्र आयनोडकर, सचिन दळवी, निलेश चाळके, जयेश भांबरकर, मनोज पुलेकर, उदयनाथ ठाकरे, संजय शिंदे, अमेय गायकवाड, राजेश सांबरे, आनंदा बंडगर, गावंड, रचना पार्टे, पुजा आदीसह रोहा अष्टमी नगर परिषदेचे कर्मचारी व अधिकारी सहभागी झाले होते.

शुक्रवारी संध्याकाळी मोर्चा रोहा पोलीस ठाणे येथे पोहचल्यानंतर मोर्चाकरांच्या वतीने रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांना निवेदन देण्यात आले. या वेळी आरोपीवर कठोर कठोर कारवाई करण्याची मागणी मोर्चाकरांच्या वतीने करण्यात आले. रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या हद्दीतील दमखाडी येथे गटाराचे पाणी वर येत असल्यामुळे अत्यावश्यक काम म्हणून नगर परिषदेचे अभियंता ओंकार भुरण व नगर परिषदेचे कर्मचारी काम करत असताना नगर परिषदचे अभियंता ओंकार भुरण यांच्यावर हल्ला झाला होता. त्यामुळे रोह्यात एकच खळबळ उडाली आहे. या भ्याड हल्ल्याचा नगर परिषद कर्मचारी संघटने कडून तीव्र निषेध करण्यात आला असून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी काळाफिती लावून काम सुरू केला आहे. आरोपीवर कठोर कारवाई न केल्यास सोमवारपासून काम बंद आंदोलन करणार असल्याचे संघटनेचेवतीने सांगण्यात आले होते. सायंकाळी चारच्या सुमारास रोहा नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी रोहा नगर परिषद ते रोहा पोलीस ठाण्यापर्यंत मोर्चा काढला. या मोर्चेकरांनी हातात भ्याड हाल्याच्या निषेधाचे फलक हाती घेतले होते. या आरोपींवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची मागणी मोर्चेकरांनी केली.

# रोहा भाजपतर्फे कर्मचाऱ्यांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपच्या वतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने रोहा तालुक्यातील उल्लेखनीय कार्य करणारे कामगार व सामाजिक क्षेत्रातील महिला व पुरुष यांचा सन्मान रोहा तालुका भाजप कार्यालयामध्ये करण्यात आला. कार्यक्रम रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग यांच्या संकल्पनेतून झाला.

कार्यक्रमात बोलताना कामगारांच्या श्रमामुळेच देश प्रगतीपथावर आहे. त्यांच्या परिश्रमाला सन्मान देण्यासाठीच १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. आम्ही या आधी एमआयडीसीतील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मोर्चे काढले, अनेकदा अपघात ग्रस्त कामगारांच्या परीवाराला मदत निधी मिळवून दीला आहे. आणी पुढील काळातसुद्धा रोहा तालुका भाजप कामगारांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या न्यायासाठी सदैव अग्रेसर राहील, असे रोकठोक मत तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी व्यक्त केले.




या कार्यक्रमामध्ये कामगार वर्गासाठी उल्लेखनीय काम करणारे अशोकजी निकम, सचिन मोरे, बचत गट तसेच घरकाम करणाऱ्या महिला यांच्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ भुतकर ताई, आरोग्य क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणारे उपजिल्हा रुग्णालय येथे चांगली सेवा देणारे किशोर सानप, डॉक्टर अशोक जाधव यांच्या इथे सांगली सेवा देणारे संतोष वखारदार, रोहा शहरातील स्मशानभूमी येथे सेवा देणारे सोलंकी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास दक्षिण रायगड सेल अध्यक्ष पीव्ही सनल कुमार, ज्येष्ठ महिला नेत्या मेघना मेघना ओक, दक्षिण रायगड चिटणीस श्रध्दा घाग ,युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोहा शहर महिला अध्यक्ष मृणाल पेंडसे, सीमा कोनकर, युवा वॉरियर्स संयोजक वैभव कुलकर्णी, ज्योती सनल कुमार, संस्कृती ओक, दिपक मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन भाजप रोहा तालुका कोषाध्यक्ष राजेश डाके यांनी केले.

# कर्तृत्ववान महिलांचा होणार गौरव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रजा सबलीकरण महासभा, नवी मुंबई आणि बुद्ध विहार संवर्धन समितीच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन, कार्य आणि संदेशाप्रमाणे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नवी मुंबईतील महिलांचा प्रत्येकी रुपये दहा हजार रोख, भारताचे संविधान, गौरव - सन्मान पत्र देऊन वैशाख पौर्णिमेच्या पूर्व संध्येला रविवार ११ मे २०२५ रोजी दुपारी अडीज वाजता, सत्याग्रह महाविद्यालयाच्या शांताबाई रामराव सभागृह, सेक्टर-७, खारघर, नवी मुंबई येथे मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार असल्याचे प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी जाहीर केले आहे

यात प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत शाळा बाह्य मुलांचा शोध घेऊन अशाना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रेरित करणे, आरटीई अंतर्गत शाळा प्रवेशासाठी जागृती करणे, विविध शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणी साठी विशेष योगदान देणे, विविध व्यावसायीक प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, बुद्ध धम्म जीवन स्वतः जगणे, धम्म उपासिका, प्रशासन, उद्योग, राजकारण, समाजकारण, कामगार व अन्य क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक बांधिलकी जपत समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकासाठी विशेष योगदान देत असलेल्या महिला आणि कार्यकर्त्या, कटुंबिक छळ, जातीय अन्याय-अत्याचारा विरुद्ध कार्य, महिला सक्षमीकरण क्षेत्रात विशेष योगदान दिलेल्या महिलांचा गौरव प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. ७ मे २०२५पर्यंत महिला नागरिकांनी ई मेल : gdongargaonkar@gmail.com तसेच तुकाराम कांबळे (८६५२५२३५०२)/ Email-tukaramvkamble@gmail.com तसेच एच. बी. जाधव (९८६७१८७६६५) यावर नावासह शिफारस करावी. शिफारस केलेल्या महिला कार्यकर्त्या आणि त्यांचे योगदान याचा पडताळणी अहवाल तयार करून एका स्वतंत्र गौरव नामनिर्देशन समितीद्वारे निश्चित केलेल्या महिलांचे नावे जाहीर केले जातील असे आयोजकांनी सांगितले आहे.

# चौलमध्ये एकपात्री अभिनय स्पर्धेस प्रतिसाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

दिवंगत ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगावकर यांच्या स्मरणार्थ एकपात्री अभिनव स्पर्धेचा खुला स्पर्धात्मक कार्यक्रम नुकताच झाला. या स्पर्धेस कलाकार व रसिक प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

चौल भाटगल्ली येथील प्रकाश कवळे यांचे निवासस्थानी, मोरया कला अकादमीत १ मे २०२५ रोजी एकपात्री अभिनय स्पर्धेचा शुभारंभ मृगज बिजुरकर यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या वेळी कला दिग्दर्शक विनायक काटकर, परिक्षक जेष्ठ रंगकर्मी सुनिल शानबाग सार्थक चासकर, निलेश खोत, आयोजक प्रकाश कवळे, सुधाकर मेस्त्री व नाट्य रसिक



प्रेक्षक यांची उपस्थिती होती.

या एकपात्री अभिनय स्पर्धा एकंदर तिन ग्रुपमध्ये घेण्यात आली, यामध्ये छोटा गटात आठ स्पर्धक मधला गटात आठ स्पर्धक व खुल्या गटात १५ स्पर्धक असे एकूण ३१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत परिक्षक म्हणून सुनिल शानबाग व सार्थक चासकर यांनी काम पाहिले. तर स्पर्धेचे प्रास्ताविक अनिल म्हात्रे व निवेदन गायत्री तुळपुळे यांनी केले. स्पर्धेत गट क्रमांक १- सात वर्षा पर्यंत, वेळ २ ते ४ मिनिटे प्रथम क्रमांक दुर्वा सुशांत झावरे, व्दितीय क्रमांक अर्थव शिंदे, गट क्रमांक २-८ ते १४ वर्षे मध्ये वेळ ३ ते ५ मिनिटे प्रथम क्रमांक तपस्या पाटील, व्दितीय क्रमांक आराध्य पाटील, तृतीय क्रमांक अनन्या गणेश परभाळे, उत्तेजनार्थ नव्या वर्तक, तसेच गट क्रमांक ३ मोठा गट १५ वर्षापुढील प्रथम क्रमांक यश कांरडे, व्दितीय क्रमांक श्रुती शिवाजी नाईक, तृतीय क्रमांक अभिषेक पाटील यांनी सुयश मिळविले.

स्पर्धेतील छोटा गटात प्रथम क्रमांकास रूपये एक हजार रोख व सन्मान चिन्ह, व्दितीय क्रमांकास रूपये पाचशे रोख व सन्मान चिन्ह तसेच मधला व मोठा गटास प्रथम क्रमांकास रूपये दोन हजार रोख व सन्मान चिन्ह, व्दितीय क्रमांकास रूपये पंधराशे रोख व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकास रूपये एक हजार रोख व सन्मान चिन्ह अशी पारितोषीके उपस्थित मान्यवर मृगज बिजुरकर कला दिग्दर्शक विनायक काटकर, परिक्षक ज्येष्ठ रंगकर्मी सुनील शानबाग सार्थक चासकर, निलेश खोत, आयोजक प्रकाश कवळे, सुधाकर मेस्त्री यांचे हस्ते वितरीत करण्यात आली.

स्पर्धेचा शेवटी मोरया कला ॲकदमीचे प्रकाश कवळे यांनी सर्व कलाकार, परिक्षक, मान्यवर मंडळी व रसिक प्रेक्षकांचे आभार व्यक्त केले.



**नागोठणे : रोहा पं.स. समितीचे माजी सभापती तथा नागोठणे सहकारी भातगिरणी संस्थेचे सभापती सदानंद गायकर यांचे पुत्र नयन याच्या लग्न सोहळ्यानिमित्त आमदार रविशेठ पाटील यांनी उपस्थित राहून आशीर्वाद दिले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादीचे नेते सदानंद गायकर, ज्येष्ठ नेते मधुकर ठमके, संतोष पाटील आदी उपस्थित होते.**

# स्वामी नारायण संस्कार केंद्राचा वर्धापन दिन

**उरण : वार्ताहर**

बि.ए.पी.एस स्वामी नारायण संस्कार केंद्र उरण-मोरा या मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन मंगळवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. संत, हरी भक्त पुरुष व महिला वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

वैदिक महापूजा आणि मूर्तीची पूजा, त्यात अक्षर पुरुषोत्तम महाराज, राधाकृष्ण, गुरु परंपरा, गणपती, हनुमान आदी मुर्तींची पूजा झाली. सत्संग, प्रवचन, आशीर्वाद आदी कार्यक्रम झाले.



मुंबई येथील स्वामी नारायण मंदिर येथून कोठारी पूज्य अभय स्वरूपदास स्वामी, पूज्य परमतृप्त सर्वेश्वर स्वामी, देववल्लभ स्वामी व अक्षर वल्लभ स्वामी आदी विशेष उपस्थित होते.

राजेश पटेल, कौशिक शाह, अविनाश कोळी, शशी कोळी, राजेश कोळी, करन ठक्कर, खेळन शाह, कीर्तन पटेल, परबत मेर, जयवीन कोळी, हितेश शाह, अजित भिंडे, मनोहर सहतीया, करण ठक्कर, धार्मिक पटेल, चिराग पटेल, नितीन कोळी, किशोर परमार, रोषण खारोल, राजेश कोळी, महादेव ढोले, जय कोळी, हरी कोळी, शरण कोळी, रवी कोळी, नीता बालदी, शोभा शाह, जयाबेन पटेल, पारुल पटेल, सुजाता कोळी, मोना पटेल, पिनल पटेल, हेमलता कोळी आदींचे सहकार्य मिळाले.

# ठिबक सिंचन पद्धती देतेय रोपांना संजीवनी

## पारसिक हिलवरील त्रिस्तरीय वृक्ष लागवडीला बहर



**नवी मुंबई : बातमीदार**

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पारसिक हिल बेलापूर येथे आगा खान एजन्सी व नवी मुंबई पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पारसिक हिल बेलापूर येथे त्रिस्तरीय वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला जातो आहे. अक्षयतृतीयेच्या दिवशी माझी वसुंधरा अभियान सप्ताह निमित्ताने या ठिकाणी नव्याने बांबू वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाला पालिकेचे उपायुक्त उद्यान किसनराव पलांडे, सहाय्यक आयुक्त अमोल पालवे, उद्यान अधिक्षक प्रकाश गिरी, उद्यान सहाय्यक गणेश देशमुख, अगाखान संस्थेच्या अमृता पराडकर व अन्य प्रतिनिधी, सजग नागरिक मंचाचे मोहन वस्त, सुधीर दाणी, दत्तात्रय सकपाळ व त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिक, पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

महाराष्ट्र सरकारने शाश्वत विकास उद्दिष्टांची प्रगती सुनिश्चित करताना हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी 'स्टेट क्लायमेट क्शन प्लॅन' योजलेला आहे. आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया या सामाजिक संस्थेने सरकारच्या या योजनेस सकाराम्तक पद्धतीने साथ देण्याच्या उद्देशाने नवी मुंबईत वसुंधरा संवर्धनाचे प्रयत्न हाती घेतलेले आहेत. डिसेंबर २४ मध्ये संस्थेने लावलेली झाडे पाण्या अभावी टिकू न शकल्याने आता त्या ठिकाणी संस्थेने सीएसआर फंडातून ठिंबक सिंचनाची शास्वत व्यवस्था केलेली असल्याने करंज, जांभूळ, चिंच, शिसम, मलबेरी, शेवगा, मोहगनी, आवळा इत्यादी भारतीय प्रजातीची तसेच त्रिस्तरीय लागवड अंतर्गत लावलेली लॅनटिना, कणेर, खस गवत, बोगनवेल असे एकूण १५ हजार झाडांना संजीवनी प्राप्त झालेली आहे. हा परिसर अगदी उन्हाळ्यातदेखील हिरवीगार झालेला आहे.

विविध प्रजातीची ७५०० झाडे, पाच हजार झुडपे व १६ हजार व्हेटीवर गवताची लागवड व संवर्धन करण्याचा मनोदय अगाखान संस्थेचा असल्याची माहिती अमृता पराडकर यांनी दिली. आगामी काळात वृक्ष लागवडी बरोबरच प्रत्येक ठिकाणी पाण्याची शास्वत व्यवस्था करत त्याचे जतन व संवर्धन यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईलआणि सर्वात महत्वाचे म्हणजे उन्हाळ्यात वाळलेल्या गवताला लागणाऱ्या आगींमुळे वृक्षांची जी हानी होते आहे ती टाळण्यासाठी जानेवारी महिन्यातच वाळलेले गवत काढले जाईल, असे मत उद्यान विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांनी मांडले.

# पान १ वरुन

## भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार विविध कार्यक्रम

आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रूजवत फक्त राजकीय नाही, तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातसुद्धा मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर देवदूताची भूमिका बजावत त्यांनी समाजाला न्याय दिला.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे उजवा आणि डावा हात म्हणून जनार्दन भगतसाहेब आणि दत्तूशेठ पाटील यांना ओळखले जायचे. भगतसाहेबांच्या आशीर्वादामुळे त्यांच्या नावाने शिक्षण संस्थेची स्थापना झाली. त्यांचे कार्य सर्व समाजासाठी होते. त्यांची स्फूर्ती नव्या पिढीला कायम मिळावी यासाठी या सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार अर्थात प्रथम क्रमांक चिंध्रण ग्रामपंचायतीने पटकाविला आहे. त्यांना एक लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांक विचुंबे ग्रामपंचायत, तृतीय क्रमांक गव्हाण ग्रामपंचायत, तर उत्तेजनार्थ पारितोषिक करंजाडे व तुराडे ग्रामपंचायतीने मिळविले आहे. द्वितीय क्रमांकाला ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकाला २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह तसेच दोन उत्तेजनार्थ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नुकताच शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या स्वस्तिका घोष हिचा सन्मान करण्यात येणार असून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणीजनांचाही गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय देवकी मीडिया प्रस्तुत व कलारंजना मुंबई निर्मित, उदय साटम संकल्पित आणि दिग्दर्शित मराठी पाऊल पडते पुढे हा १०१ कलावंताचा संच असलेल्या कार्यक्रमाचा ४६००वा प्रयोग सादर होणार आहे, अशीही माहिती देत या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे हा पुण्यतिथी व सत्कार समारंभ होणार असून या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती लाभणार असून समारंभाध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, सभासद वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार असल्याची माहिती जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी दिली.

स्व. जनार्दन भगतसाहेबांचे कार्य अफाट राहिले आहे. त्यांनी आमच्या विभागावर मोठे उपकार केले आहेत. भगतसाहेबांनी कुटुंबासाठी नाही, पण समाजाच्या हितासाठी आयुष्य खर्च केले. बेळगाव सीमा प्रश्नावर त्यांनी एक वर्ष तुरूंगवास भोगला आहे. त्यांचा त्याग आणि स्मृती कायम राहावी यासाठी अशा कार्यक्रमांचे नियमित आयोजन करण्यात येत असल्याचेही देशमुख यांनी नमूद केले.

## पनवेल रेल्वेस्थानकातील समस्या मार्गी लावाव्यात

नुकताच सुरू झालेला अटल सेतू, जेएनपीटी तसेच लवकरच कार्यान्वित होणारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या सर्व बाबींमुळे परिसरात व्यापारी वसाहत व लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल रेल्वेस्थानकाचा अत्याधुनिक स्वरूपात विकास करणे व प्रवाशांच्या सुविधेसाठी आवश्यक उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे असून प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि चारमधील सबवेला नवीन पनवेल (पूर्व)पर्यंत वाढवणे, सध्याचा फूट ओव्हरब्रिज लोकसंख्येच्या तुलनेत अपुरा असून त्याऐवजी नवीन व अधिक रुंद एफओबी उभारणे गरजेचे आहे.

पनवेल स्टेशनच्या पूर्व बाजूस पार्किंग डेकचे काम अद्याप अपूर्ण असून त्यामुळे वाहतूक कोंडी व पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होत आहेत. हे काम तातडीने पूर्ण करावे. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर एक्सलेटर तसेच दिव्यांग, वृद्ध व गरोदर महिलांसाठी लिफ्ट्स उपलब्ध करणे आवश्यक आहे. स्टेशनची इमारत अत्यंत धीम्या गतीने उभी राहत आहे. त्यामुळे या कामास फास्ट ट्रॅकवर नेण्याची गरज आहे. हार्बर लाइन, मुख्य लाइन व लोकल रेल्वे लाईन यामधील इंटरकनेक्शन लूप तयार करणे गरजेचे आहे, जे आपत्कालीन परिस्थितीत उपयुक्त ठरू शकणार आहे, याकडेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी रेल्वेमंत्र्यांचे निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे.

पनवेल रेल्वे स्टेशनाला 'अ' दर्जा प्राप्त असला तरी येथे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ते पाहता प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी सर्व गोष्टींवर तातडीने कृती करण्यात यावी आणि त्यासाठी या विषयाकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्यात यावी, अशी विनंती आमदार प्रशांत ठाकूर यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

# दुखवटा

## हुसनाबानू कडवेकर


**नागोठणे :** ग्रामपंचायतीचे कर्तव्यदक्ष माजी सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नागोठणे एज्युकेशन



सोसायटीच्या उर्दू हायस्कूल व ज्यु. कॉलेजचे संस्थापक सेक्रेटरी लियाकतशेठ कडवेकर यांच्या पत्नी हुसना बानू लियाकत कडवेकर यांचे शुक्रवारी (दि.२) वयाच्या ५९व्या वर्षी निधन झाले. पै. हुसना बानू यांच्या अंतयात्रेत शुक्रवारी दुपारी ४ वाजता विविध स्तरातील मान्यवर, हिंदू मुस्लिम बांधव, आप्तेष्ट, ग्रामस्थ व लियाकत कडवेकर यांचा मित्रपरिवार मोठया संख्येने सहभागी झाले होते. पै. हुसना बानू यांच्या पश्चात पती, मुलगा, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## सदाशिव कवठे


**पनवेल :** महापालिकेचे कामोठे प्रभागाचे अधीक्षक सदाशिव कवठे यांचे अल्पशा विकाराने निधन



झाले. १९९५ साली तत्कालिन नगर परिषदेत लिपीकपदी रूजू होऊन त्यांनी लेखा अधिकारी पदी काम केले होते. पनवेल महापालिकेत चारही प्रभागांच्या प्रभाग अधिकारीपदी त्यांनी काम केले होते तसेच निवडणूक विभाग प्रमुख, अतिक्रमणविरोधी विभाग प्रमुख, परवाना विभाग प्रमुखपदी त्यांनी काम केले होते.

## निवडक

### अजिवलीतून ज्येष्ठ व्यक्ती बेपत्ता



**पनवेल :** चारचाकी गाडीवर क्लिनर म्हणून कामास आलेले ५९ वर्षीय ज्येष्ठ ते कोणास काही एक न सांगता सहारा पार्कींग हॉटेल अजिवली येथून कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राजू घुडूभाई उस्ताद (वय ५९ रा.बार्शी) रंग सावळा, उंची पाच फुट, अंगाने सडपातळ, केस पांढरे, चेहरा उभट, दाढी साधारण वाढलेली, पुढील दात काही पडलेले, डोळे लालसर, डोक्यावर निळी टोपी असून अंगात निळा शर्ट व काळी पॅन्ट तसेच हातात सतत हातरुमाल असतो. त्यांना हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.ना.नितीन डगळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अपघातामध्ये दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** ट्रकच्या धडकेने एका मोटरसायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील जेएनपीटीकडून हायवेने पनवेल बाजूकडे येत असताना गव्हाण फाट्याजवळ विदेशी हॉटेल समोर घडली आहे. भाऊ कुणाल इंगळे (वय २४, रा.नावडे कॉलनी) असे या मयत इसमाचे नाव असून ते होंडा शाईन मोटरसायकलने जात असताना गव्हाण फाट्याजवळ पनवेल लेनवर विदेशी हॉटेलसमोर आलेल्या ट्रकने रहदारीच्या विरुद्ध दिशेने येवून त्याच्याकडील वाहन हयगयीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवून मोटरसायकलला धडक दिल्याने त्यात भाऊ कुणाल इंगळे हे गंभीररित्या जखमी होवून मयत झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मंदा म्हात्रे, शंकुतला पाटील सेवानिवृत्त

**उरण :** तालुक्यातील गोवठणे गावातील अंगणवाडी सेविका मंदा श्रीराम म्हात्रे व शकुंतला नरेश पाटील या दोघेही २९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवे नंतर अंगणवाडी सेविका म्हणून सेवानिवृत्त झाल्या आहेत. दोघी गोवठणे गावातील असून सेवानिवृत्ती नंतरचे त्यांचे आयुष्य आणि आरोग्य सुंदर, चांगले रहावे अशी प्रार्थना सर्वांनी ईश्वरा कडे केली आहे. हा कार्यक्रम उरण बीजेपी महिला मोर्चा अध्यक्ष राणी सुरज म्हात्रे यांनी आयोजित केला होता. सेवानिवृत्त वेळी अनेक महिला, ग्रामस्थ व उपस्थितांना अश्रू अनावर झाले.



# पनवेलमध्ये मान्सूनपूर्व कामांना प्राधान्य

## तयारी व आपत्ती व्यवस्थापनाबाबत आयुक्तांकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत आपत्ती ओढावू नये यासाठी महानगरपालिका व इतर विविध विभागाच्यावतीने सुरू असलेल्या मान्सुन पूर्व कामांचा आढावा शुक्रवारी (दि.२) मुख्यालयात घेतलेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी घेतला.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी केशव शिंदे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, उपअभियंता विलास चव्हाण, चारही विभागचे विभाग प्रमुख, वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदिप पवार, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, आयआरबी प्रतिनिधी उपस्थित होते.

### *विभागानुसार अधिकाऱ्यांना विविध सूचना*

*पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवरती साथरोगासारखे विकार उद्भवल्यास तयारीच्या दृष्टीने औषधसाठा व इतर वैद्यकिय सेवासुविधांची पुर्तता करण्याबाबत वैद्यकिय आरोग्य विभागास आयुक्तांनी सांगितले. धोकादायक झाडे तोडणे, फांद्या तोडण्याचे काम विद्युत विभागासोबत समन्वय साधून करण्याबाबत आयुक्तांनी सांगितले.*

धोकादायक इमारती निष्कांसित करण्यासाठी पनवेल महापालिकेस पोलीस विभागाने सहकार्य करण्याबाबत या वेळी आयुक्तांनी सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांना सांगितले. तसेच पावसाळ्यात पांडवकडा भागात पोलीस बंदोबस्त करण्याबाबत करण्याविषयी आयुक्तांनी पोलीस विभागास सांगितले.

पावसाळयात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवरती एसटीपी प्लॅन्टमधील पंप सुरू ठेवावेत, त्यांची दुरूस्ती करून ठेवण्याबाबत आयुक्तांनी सिडको अधिकाऱ्यांना सूचित केले. याचबरोबर बस स्टॅन्डसमोरील हायवेवरील रस्त्यावर पडणारे पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व आयआरबी यांना आयुक्तांनी सूचित केले. याचप्रमाणे रस्त्यांकडील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करून महापालिकेस कळविण्यासंबधित आयुक्तांनी सूचना दिल्या.

पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा नादुरूस्त शाळा पावसाळयापूर्वी दुरूस्त करून घेण्याबाबत आयुक्तांनी सांगितले.

महापालिका कार्यक्षेत्रातील आत्तापर्यंत झालेल्या नालेसफाईच्या कामाचा आढावा घेऊन उर्वरीत लहान मोठ्या सर्व नालेसफाईची कामे २० मेपर्यंत पुर्ण करण्याबाबत आयुक्तांनी आरोग्य विभागास सूचना दिल्या.

# गौरवशाली ग्रामपंचायतींना नेहमीच सहकार्य केले जाईल –खासदार तटकरे

**चौक, प्रतिनिधी : प्रतिनिधी**

आपल्या ग्राम पंचायत हद्दीतील ग्रामस्थांसाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या गौरवशाली ग्राम पंचायत यांना सर्व प्रकारची शासकीय मदत करण्यास आनंद होतो, असे गौरवशाली उदगार खासदार सुनील तटकरे यांनी काढले.

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे यांनी सोलर दिवे आणि हायमॅक्स दिव्यांचे लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रम, दिव्यांग यांना घर घंटी वाटप, ग्राम पंचायत हद्दीतील नागरिकांना पिशव्या वाटप, ग्राम पंचायत स्थापना पासून सरपंच पदाचा कारभार करणारे सरपंच यांचा सत्कार कार्यक्रम खासदार सुनील तटकरे व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.



या वेळी ग्राम पंचायत यांनी केलेल्या कामाचे त्यांनी कौतुक करून ग्रामपंचायतला मिळालेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल खजड हे नामांकन प्राप्त झाले आहे, हे प्रमाणपत्र खासदार सुनील तटकरे यांनी सरपंच उमा मुंढे यांच्या कडे दिले. आपल्या प्रास्ताविक भाषणात खासदार सुनील तटकरे व आमदार महेश बालदी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त करून ग्रामपंचायत यांनी केलेल्या विकास कामांचा आढावा घेताना माझी वसुंधरा अभियान अंतर्गत ५.०मध्ये वासंबे ग्राम पंचायत कोकण विभागात प्रथम असल्याचे सांगितले.

वासंबे ग्राम पंचायत व परिसर यांचा विकास करायचा असेल तर नगर परिषद होणे गरजेचे आहे, त्यासाठी आपण पाठपुरावा करीत असून खासदार सुनील तटकरे यांनी सहकार्य करावे असे आमदार महेश बालदी यांनी सांगून विकास कामांना लागणारे आर्थिक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या वेळी संदीप मुंढे, सुरेश पाटील, कैलास म्हात्रे, राकेश खरड, लक्ष्मण परांगे, उपसरपंच पारंगे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये पोलिसांची पायी गस्त; गुन्हेगारीला आळा

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या आठ दिवसांपासून पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत हद्दीच्या वेगवेगळ्या ठिकाणी पायी गस्त मोहिम राबविण्यात येत असल्याने गुन्हेगारांमध्ये चांगलीच धडकी बसली आहे.



पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वडघर फाटा ते काळीवाडा, मुसलमान नाका, टपाल नाका, पंचरत्न चौक, सिंधी हॉल, प्रशांत लॉज, गांधी हॉस्पीटल, आमदार निवास, मिडलक्लास सोसायटी, पुरोहित सोसायटी, एसबीआय बँक, बीजेपी कार्यालय, कर्नाळा भाजी मार्केट, जव्हेरी बाजार, जयभारत नाका, लाईन आळी, दि.बा.पाटील शाळा, सावरकर चौक, टिळक रोड, उपजिल्हा रूग्णालय, परदेशी आळी, सावरकर चौक, वडाळे तलाव, अशोक बाग, प्राचीन हॉस्पीटल, प्रांत ऑफीस कडून पनवेल शहर पोलीस ठाणे अशी पायी गस्त करण्यात आली.

या पायी गस्त करिता एक वपोनी, एक पोनी, पाच सपोनी/ पोउपनि तसेच १९ अंमलदार हजर होते. या वेळी बेकायदेशीर व्यवसाय करणार्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच वडाळे तलाव परिसरात दुचाकी तसेच चारचाकी वाहने वेगाने चालविणे, वाहतूक कोंडी करणे आदींवर सुद्धा कारवाई करण्यात आली.

ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग यांना मार्गदर्शन सुद्धा यावेळी करण्यात आले. या उपक्रमाचे पनवेलकरांनी कौतुक केले आहे.

# कुंभारवाडा युवक मंडळातर्फे महाराष्ट्र दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुंभारवाडा युवक मंडळ, मिर्ची गली, पनवेल (श्री संत गोरा कुंभार प्रतिष्ठान, कुंभार समाज महिला मंडळ, राजयोगी सार्वजनिक गौरा गणपती मंडळ) यांच्या संयुक्त विद्यमाने कामगार दिन आणि महाराष्ट्र प्रतिष्ठान दिन साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने आयोजकांकडून सत्यनारायण महापूजेचेही आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये तीर्थ प्रसाद आणि महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

या वेळी भाजप शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, मनसे प्रदेश प्रवक्ते योगेश चिले, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, पनवेल एलआयसी शाखेचे अर्थ सल्लागार नित्यानंद कोळी, प्रसन्न गोडसे, प्रजापती समाज विकास मंडळ निबंधकचे राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी. प्रजापती आणि इतर मान्यवर आणि पनवेल शहरातील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष रितेश पवार, उपाध्यक्ष राजेंद्र परदेशी, सचिव रूपेश तळोजकर, कोषाध्यक्ष संदीप पनवेलकर, उपकोषाध्यक्ष विश्वास काळवेकर आदींनी योगदान दिले.



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय झाला आणि या निर्णयाचे संपूर्ण देशभर स्वागत करण्यात आले. याच अनुषंगाने कळंबोली भाजपच्या वतीने जातनिहाय जनगणनेचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अभिनंदनाचा ठराव पास करून जल्लोष साजरा करण्यात आला. या वेळी कळंबोलीमधील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.**

# सावरखार येथील हरेश्वर ठाकूर केंद्र शासनातर्फे सन्मानित

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील सावरखार येथे राहणारे नागरी संरक्षण दलाचे मानसेवी अधिकारी हरेश्वर जनार्दन ठाकूर यांना महानिदेशालय, गृहमंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्यातर्फे BRONZE DISK कांस्य डिस्क देऊन गौरव करण्यात आला. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे उत्तम काम केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देवून सन्मानित केले आहे.



१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या दिवशी उरण तहसील कार्यालयात उरण विधानसभा मतदार संघ आमदार महेश बालदी यांनी हरेश्वर जनार्दन ठाकूर यांचे अभिनंदन केले. या वेळी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मेट्रो सेंटर जनार्दन कासार, उरण तहसीलदार डॉ.उद्धव कदम, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, उरण नगर परिषद मुख्याधिकारी समीर जाधव व मान्यवर उपस्थित होते.

### पनवेल महानगरपालिकेचा उद्या लोकशाही दिन

**पनवेल :** महापालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी म्हणजे सोमवार ५ मे रोजी सकाळी ११ वाजता मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी ज्या नागरिकांनी अर्ज केले आहेत, त्यांनी ५ मे रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# भाजप सांस्कृतिक महोत्सवाला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर भाजपच्या वतीने १ ते ४ मेदरम्यान खारघरमधील सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर भाजप सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले आहे.






या महोत्सवात मनोरंजन, इतिहास, कला आणि महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा अनोखा संगम पाहायला मिळत असून नागरिकांचा याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहेत. या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी खारघर आणि पनवेल परिसरातील विविध संस्थांनी सांस्कृतिक कलाविष्कार सादर केले. यामध्ये पारंपरिक नृत्य, लोकगीते, नाटक आणि संगीत यांचा समावेश होता. या कलाविष्कारांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या महोत्सवाला खारघर आणि पनवेल परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून त्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.










# अनहोनी

## ५२ वर्ष हंगामा हो गया...हंगामा

मला आठवतंय, फार पूर्वी रहस्यरंजक चित्रपटाच्या जाहिरातीत म्हटले जात असे, सुरुवात चुकवू नका. शेवट कोणाला सांगू नका.

अशा पिक्चरला थोडं लवकरच जायची सवय लागली होती. उगाच पिक्चरची सुरुवात चुकायला नको (आणि एकदा का मेन पिक्चर सुरू झाले की आपल्या शेजारच्याच सीटवरील कोणी धडपडत यायला नको. उगाच पडद्यावरचं लक्ष विचलित व्हायचं.) आणि अशा सस्पेन्स पिक्चरचा शेवट गप्पांच्या ओघात कोणालाच सांगायचा नाही असे स्वतःलाच बजावून सांगून ठेवलेले असे.

जाहिरातीवरील वाक्य वाचायला सोपे, पण त्यात कित्येक गोष्टी दडलेल्या. (हल्लीच्या चित्रपट जाहिरातीत एकच वाक्य असते, जवळच्या चित्रपटगृहात बघा.)




असाच एक म्युझिकल रहस्यरंजक चित्रपट अनहोनी... चित्रपटाची सुरुवात अतिशय इंटरेस्टींग, एक्स्प्रेस ट्रेन तुफान वेगाने सुसाट धावत आहे. खडखडाट खडखडाट करीत धावतेय. त्या काळातील थिएटरमधील मोनो साऊंड सिस्टीमही उत्तम वातावरण निर्मिती करे. फर्स्ट क्लासच्या बोगीतून मिसेस राय बहादूर सिंग (कामिनी कौशल्य) आणि त्यांची मुलगी डॉ. रेखा (लीना चंदावरकर) प्रवास करताहेत आणि अगदी अचानक चाकू हातात घेतलेला एक वेडा (संजीवकुमार) त्याच डब्यात त्यांच्या समोर येताच त्या दोघी किंचाळतात. विलक्षण घाबरतात. (आपणही बसल्या जागी दचकतो. होय. त्या काळातील पब्लिक पडद्यावरील गोष्टींशी समरस होई) त्यातून त्या स्वत:ला कसंबसं सांभाळतात. तोही थोडासा नॉर्मल होतो. त्याला असेच सोडून देण्यापेक्षा त्याच्यावर उपचार करावेत. त्याची मानसिक स्थिती ठीक करावी. त्याला नॉर्मल करावे असे डॉ. रेखा ठरवते. त्याला इस्पितळात दाखल करते. घरी आणते. पिक्चरची सुरुवात ही अशी उत्सुकता निर्माण करणारी. सस्पेन्स पिक्चर असाच असावा असे वाटणारे हे वातावरण. तोपर्यंत इंग्लिश चित्रपट हायफाय प्रेक्षकांसाठी आहेत असाच समज होता.

...त्यात तो वेडा (खरंच का?) बरा होत जाताना ती त्याच्याकडे आकर्षित होते. चक्क हळूहळू त्याच्या प्रेमात पडते (ते व्हायलाच हवे) आणि त्याच विश्वासात ती त्याला आपल्या पित्याचे निधन कसे झाले, ती हत्या असावी असे वाटते असे सत्य त्याला अतिशय विश्वासाने व मोकळेपणाने सांगते. तो सगळं व्यवस्थित ऐकून घेतो आणि एक फोन लावतो आणि बोलतो, मी पोलीस इन्स्पेक्टर सुनील बोलतोय... त्याचं हे बोलणे ऐकून रेखा हादरते. (आणि एव्हाना चित्रपटात गुंतलेले आपणही दचकतो. येथे दिग्दर्शक दिसतो असेच म्हणायला हवे.) तिला हा आश्चर्याचा मोठाच धक्का असतो. आपल्यालाही असतोच आणि पडद्यावर येते, मध्यंतर... अचूक टायमिंग. म्हणजेच बाहेर जाऊन पटकन वडापाव घेऊन येवून खुर्चीवर बसायला हवे यासाठीची धडपड.

रवि टंडन दिग्दर्शित 'अनहोनी' (प्रदर्शन ४ मे १९७३)च्या मध्यंतरला आम्ही चित्रपट रसिक भारावून गेलेलो असतो. माझे ते शालेय वय होते आणि माऊथ पब्लिसिटीवर पिक्चर हिट होण्याचे ते दिवस होते. तेव्हा चित्रपट व क्रिकेट यावर नाका, गच्ची, गॅलरी, कट्टा, अड्डा येथे भरभरुन बोलले जात असे. त्यातून पिक्चरचा खरा रिपोर्ट पसरत असे.

'अनहोनी' मेन थिएटर लिबर्टीत झळकला आणि पिक्चर रहस्यरंजक आहे अशी कानोकानी चर्चा होत गेली आणि चार आठवड्यानी आमच्या गिरगावातील सेन्ट्रल थिएटरला तो शिफ्ट होताच हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केला... चित्रपट हे समूहासह पहायचे मनोरंजन आहे हे रुजलेला तो काळ होता. म्हणजे पिक्चर एन्जॉय करताना एकटेपण वाटू नये.




याला बावन्न वर्ष झाली कधी झाली हे समजलेच नाही.

मध्यंतरानंतर 'खून कसा झाला? कोणी केला? कशाला केला? का केला?' याच्या क च्या बाराखडीतून रहस्याचा वेध सुरु होतो. सस्पेन्स पिक्चर म्हणजे सतत टर्न आणि ट्वीस्ट हवेत. आपण चित्रपट पाहताना जसा विचार करतो तसे न घडता, भलतेच घडणे आणि संपूर्ण पिक्चरभर ज्याच्यावर संशय येत नाही तोच नेमका गुन्हेगार असणे अशी पटकथा व दिग्दर्शन असेल तर पिक्चर हिट. 'अनहोनी'च्या अगोदर प्रसाद प्रॉडक्सन्सच्या एल. व्ही. प्रसाद निर्मित व चंदर बोहरा दिग्दर्शित 'खिलौना 'तही संजीवकुमारचा असाच वेडा (पण कारण वेगळे. हा चित्रपट साऊथच्या चित्रपटाची रिमेक होता ) पाहिला असल्याने यावेळी तशा रुपात पाहताना त्याला सहानुभूती राहिली. पण तो तर... हा चकमा म्हणजेच यश आणि पिक्चरमध्ये मध्यंतरानंतर काय घडेल याचे कुतूहल. तेच तर महत्त्वाचे.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटांच्या एकूणच यशाची वेगळीच स्टोरी आहे. एकाच वेळेस पौराणिक चित्रपट (जय संतोषी मा) आणि समांतर चित्रपट (निशांत) असे दोन टोकाचे चित्रपट यशस्वी ठरत होते. यासह अनेक प्रकार होतेच. बहुस्तरीय हा शब्द बरोबर ठरावा आणि त्यात एक होता, सस्पेन्स चित्रपट. याच दशकावर 'शोले'चा प्रभाव तसाच 'छोटीसी बातचा'ही. 'अमर अकबर ॲन्थनी' सुपरहिट नि 'गोलमाल'देखील. सत्तरचे दशक सुपरहिट हिंदी चित्रपटाचा सुवर्णकाळ.

रहस्यरंजक चित्रपटांची पाळेमुळे साठच्या दशकात सापडतात. बी.आर. चोप्रा यांचा 'कानून' हा कोर्ट रुम ड्रामा यापासून रवि टंडन दिग्दर्शित 'खेल खेल मे', ब्रीज दिग्दर्शित 'मगरुर' असा हा जवळपास दीड दोन दशकांचा प्रवास आहे. 'कानून' चक्क गीतविरहीत होता. सस्पेन्स पिक्चरमध्ये चोरीची गोष्ट (ज्वेल थीफ, तिसरी मंझिल, व्हिक्टोरिया नंबर २०३, छुपा रुस्तम, बुलेट, शालिमार, लूटमार), भूताची गोष्ट (बीस साल बाद, कोहरा), खूनाची गोष्ट ( धुंद, परदे के पीछे) असे प्रकार असत. त्यात एक कॉमन फॅक्टर सुपर हिट गीत संगीत व नृत्य यांचा. यात रामसे बंधुंच्या थरारपटाची तर्हाच वेगळी. ते सस्पेन्स कमी आणि भयपट जास्त वाटत. दो गज जमी के नीचे, अंधेरा, दरवाजा, और कौन असे त्यांचे पिक्चर्स पाहिले न पाहिले तरी ते लक्षात येईल. राजा परांजपे दिग्दर्शित 'पाठलाग' या म्युझिकल रहस्यरंजक चित्रपटावरुन हिंदीत राज खोसला दिग्दर्शित 'मेरा साया' बनला, तोही सुपर हिट. त्या काळात सस्पेन्स पिक्चर एक यशस्वी जॉनर होता. वह कौन थी, गुमनाम, यह रात फिर न आयेगी, हमशकल, हमराज, आमने सामने, उस्तादों के उस्ताद, परवाना, कब क्यू और कहा, धुन्द, खून खून, बेनाम, फिर वही रात असे बरेच रहस्यरंजक चित्रपट रसिकांनी एन्जॉय केले. यश चोप्रा दिग्दर्शित 'इत्तेफाक' यात नाट्यमय. हा गीतविरहीत. क्लायमॅक्स अतिशय धक्कादायक असलेला चित्रपट. संपूर्ण चित्रपट परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत चित्रीत झाला.

एकदा का सस्पेन्स माहीत पडल्यावर तो चित्रपट पुन्हा कशाला बघा असा प्रश्न स्वाभाविक, पण तरीही हे सस्पेन्स पिक्चर मॅटीनी शोला पुन्हा पुन्हा पाहिले जात. याचे कारण त्याचे लोकप्रिय गीत संगीत.

'अनहोनी'चीही मै तो एक पागल, पागल क्या दिल बहेलाए गा, हंगामा हो गया ही गाणी लोकप्रिय. वर्मा मलिक यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत. बिंदूच्या धमाकेदार नृत्याची रंजकता असलेले हंगामा हो गया गाणे तुफान लोकप्रिय होते.

पोस्टरभरचा दाढीधारी आणि हाती चाकू घेतलेला संजीवकुमार 'अनहोनी'ची जातकुळी स्पष्ट करीत होता. थीमनुसार पोस्टर हवे ते हे असे. येथे दिग्दर्शक दिसतो म्हणूयात. बावन्न वर्षांनंतरही हा इफेक्ट कायम आहे हो. जुन्या काळातील चित्रपटांची ती ताकद आहे.

आज असे म्युझिकल रहस्यरंजक चित्रपट का बनत नाहीत हा प्रश्न निर्माण होत असला तरी त्याचे उत्तर कोण देणार? ते एक रहस्यच राहिलयं. 'इत्तेफाक 'ची रिमेक आली, पण रंगली नाही, याचं कारण मूळ चित्रपटातील नायिकेभोवती (नंदा) ड्रामा होता. 'खेल खेल मे'वरून 'खिलाडी' बनला, पण मूळ चित्रपटातील प्रेमाच्या गोष्टीतील विघ्न आणि रहस्याचा चकमा भारी होता. अगदी ज्वेल थीफ चीही रिमेक आली. त्यात तोही रंगला नाही. 'अनहोनी'वरून 'छोटे सरकार' बनताना नायिकेभोवती (शिल्पा शेट्टी) थीम रचल्याने ड्रामा खुललाच नाही. यात नायकाकडून (गोविंदा) अनवधनाने गुन्हा घडतो आणि नायिका पोलीस इन्स्पेक्टर असते अशी गोष्ट फिरवण्यात आली. त्या काळात गोविंदाच्या चित्रपटांच्या अफाट पिकात हा चित्रपट आला नि गेलादेखील.

दिग्दर्शक रवि टंडनने अनहोनीच्याच हिट टीमला (संजीवकुमार व लीना चंदावरकर) घेऊन अपने रंग हजार (१९७५) बनवला, ती खेळीही फसली. त्यातले किशोरकुमारने छान मस्तीत गायलेले आणि संजीवकुमारने तेवढ्याच गमतीदारपणे साकारलेले मेरी काली कलुटी के नखरे बडे हे गाणे लोकप्रिय झाले इतकेच. पिक्चर मात्र रसिकांनी नाकारले.

आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीने ओटीटीवर 'अनहोनी' पहायला काहीच हरकत नाही.

# अष्टपैलू अभिनेते निळू फुले

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये ग्रामीण खलनायकाला स्वत:च्या खास शैलीने रंगवणारे एक श्रेष्ठ अभिनेते म्हणजे निळू फुले. पुण्यातील सासवड तालुक्यात खळदखानवली येथे निळू फुले यांचा जन्म ४ एप्रिल १९३० रोजी झाला. त्यांचे वडील कृष्णाजी फुले, आई सोनाई फुले आणि सहा भाऊ व चार बहिणी यांच्यासह एका छोट्याशा खोलीत त्यांचे बालपण गेले.

बालवयातील काही वर्षेपुण्यातील खडकमाळ आळीत त्यांचे वास्तव्य होते. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असल्यामुळे प्राथमिक शिक्षणासाठी त्यांना मध्य प्रदेशात त्यांच्या काकांकडे पाठवले होते. कलेविषयीच्या काकांच्या अभिरूचीमुळे ग्रामोफोन ध्वनिमुद्रिका ऐकणे, मोठ्या पडद्यावर मैदानात दाखवले जाणारे चित्रपट पाहणे, प्रख्यात साहित्यिकांच्या कलाकृती वाचणे या सगळ्याचा त्यांच्या मनावर एकत्रित सकारात्मक परिणाम होत होता.

इयत्ता चौथीमध्ये साधारणपणे १९३८च्या सुमाराला निळू फुले पुण्याला शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये दाखल झाले. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणाचा हा काळ निळूभाऊंना सर्वार्थाने समृद्ध करणारा ठरला. शाळेमध्ये इतर विषयांबरोबर मोडी लिपीही शिकवली जात असे. व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. प्रख्यात कवयित्री शांताबाई शेळके त्यांना मराठी शिकवत असत. त्यांच्यामुळे निळूभाऊंची साहित्यिक जाण अधिक प्रगल्भ होत गेली.

वाचनाची आवड त्यांना होतीच, तिला शाळेतल्या शिक्षकांमुळे योग्य दिशा मिळत गेली. शाळेचे मुख्याध्यापक आणि निळूभाऊंचे मार्गदर्शक गुरुवर्य बाबूराव जगताप यांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात राष्ट्र सेवादलाचे काम मोठे होते. ते भाई वैद्य, गोपाळ अवस्थी, डॉ. बाबा आढाव या आपल्या मित्रांसमवेत नेमाने राष्ट्र सेवादलात जाऊ लागले.

अल्पावधीतच कलापथकाच्या पथक प्रमुखाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली गेली. त्या निमित्ताने त्यांचे चतुरस्र वाचन सुरू झाले. नोकरी करायची नाही, हेसुद्धा तेव्हाच नक्की झाले. त्यांचे वडील उपजीविकेसाठी लोखंडाचे तसेच भाजीपाल्याचे दुकान चालवित होते. मॅट्रिक झाल्यानंतर निळू फुले यांना उदरनिर्वाहाचा विचार करणे भाग होते. त्यासाठी त्यांनी शेतकी महाविद्यालयात माळीकामाचे शिक्षण घेतले.

आर्म्ड फोर्सेस मेडिकल महाविद्यालयामध्ये त्यांनी माळ्याची नोकरी स्वीकारली. नोकरी करत असताना त्यांचे सेवादलाचे कामही सुरूच होते. सेवादलातील चर्चा, विचारमंथन याने त्यांची स्वत:ची मते निश्चिकत होत गेली. अत्यंत साधेपणाचा पुरस्कार करणार्याय निळूभाऊंवर डॉ. राम मनोहर लोहियांच्या विचारांचा खोलवर प्रभाव पडला.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत, तसेच गोवा मुक्ती आंदोलनात निळू फुले यांचा सक्रिय सहभाग होता. राष्ट्र सेवादलासाठी त्यांनी १९५७ साली 'येरागबाळ्याचे काम नव्हे' हा वग स्वत: लिहिला आणि सादर केला. वग असो, नाटक असो वा चित्रपट – स्वत:च्या खास शैलीने त्यांनी त्या त्या भूमिका अजरामर केल्या.

केवळ चेहऱ्याच्या संयत हालचाली, डोळे, पापण्या, ओठ, गाल अशा चेहऱ्यावरच्या सूक्ष्म हालचालींमधले संथ तरीही आशयसंपन्न फरक, त्यांच्या भूमिकेतून फार मोठा परिणाम साधत असे. सामाजिक समस्यांशी आणि त्यांच्या निराकरणासाठी झटणाऱ्या निळू फुले यांना सामाजिक समस्यांना तोंड फोडणारी 'सूर्यास्त', 'सखाराम बाईंडर', 'बेबी' यांसारखी मोजकी नाटके करायला मिळाली, पण त्यांनी सहजसुंदर अभिनयाने आणि अचूक निरीक्षणाने या नाटकातल्या भूमिकांना एका उंचीवर नेऊन ठेवले.

विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाईंडर' हे नाटक कमलाकर सारंग यांनी दिग्दर्शित करताना सखारामच्या भूमिकेसाठी 'लोकनाट्यवाला' म्हणून निळूभाऊंचे नाव घेतले गेले. पंचेचाळीस दिवस अथक परिश्रमाने तालमी करणाऱ्या निळूभाऊंच्या या भूमिकेने नाट्यक्षेत्रात इतिहास घडवला. या नाटकाने त्यांना रंगभूमीच्या प्रवाहात शिरण्याची संधी मिळाली.

विजय तेंडुलकरांच्या 'बेबी' या नाटकातली 'राघव' ही नायिकेच्या भावाची आव्हानात्मक भूमिकाही निळू फुलेंनी पेलली. त्यांच्या नाट्यकारकीर्दीतली 'सूर्यास्त'मधील आप्पाजींची भूमिका त्यांच्या जिवंत आणि अलौकिक अभिनयकलेचा वस्तुपाठ ठरली. 'लग्नाची बेडी', 'रण दोघांचं', 'प्रेमाची गोष्ट', 'राजकारण गेलं चुलीत' यांसारख्या नाटकांमधून लहानमोठ्या भूमिका त्यांच्या खास ढंगात साकारल्या.





निळू फुले यांनी शंकर पाटील लिखित 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' या लोकनाट्यातून महाराष्ट्रभर विनोदाची आणि नाट्याची धमाल उडवून दिली. याच धर्तीवर व्यंकटेश माडगूळकरांचे 'बिनबियांचं झाड', 'कुणाचा कुणाला मेळ नाही' आणि द.मिरासदारांचे 'भलताच बैदा झाला', 'मी लाडाची मैना तुमची' ही लोकनाट्ये गावागावात पोहोचवण्याचे श्रेय निळू फुलेंना जाते. याशिवाय 'जंगली कबूतर' हे वसू भगतलिखित नाटक व्यावसायिक आणि भडक होते. पण त्यांनी तीन प्रवेशांपुरते केलेले मयादित कामही प्रेक्षकांचे मन जिंकून जात असे. नाटकांच्या संदर्भात निळू फुले यांना वेगवेगळी व्यक्तिमत्त्वे साकारता आली.

बाबूराव गोखले यांच्या नाट्यसंस्थेच्या 'मास्तर एके मास्तर' या नाटकात निळू फुले काम करत होते. याच नाटकात काम करणार्याा रजनी मुथा या अभिनेत्रीशी त्यांचा परिचय झाला आणि पुढे लग्नात त्याची परिणती झाली. अतिशय साधेपणाने त्यांचा विवाह झाला. यथावकाश त्यांना मुलगी झाली गार्गी. नाटक, सेवादल आणि चित्रपट अशा अतिशय व्यग्र वेळापत्रकात कुटुंबाला पुरेसा वेळ देता येत नसे, पण त्यांच्या पत्नीने निळू फुले यांच्या कारकिर्दीला संपूर्ण पाठिंबा दिला.

अनंत माने दिग्दर्शित 'एक गाव बारा भानगडी' या चित्रपटातल्या लोकमानसात रुजलेल्या 'झेलेअण्णा' या पहिल्याच भूमिकेने निळू फुले यांचे चित्रपटसृष्टीतील स्थान निश्चि त केले. चंद्रकांत यांनी अचानक नाकारलेली भूमिका निळू फुलेंना मिळाली. या भूमिकेसाठी त्यांच्या सहजप्रवृत्तीनुसार त्यांनी जीव ओतला. या चित्रपटातील 'झेलेअण्णा' लोकप्रिय झाले. पुण्यातील चित्रपटगृहात हा चित्रपट शंभर आठवडे चालला. त्यानंतर खलनायकी ढंगाचे अनेक चित्रपट त्यांना मिळू लागले.

काही साचेबद्ध आणि एकाच तर्हे.च्या भूमिकांमधून त्यांनी ग्रामीण इरसालपणा आणि बेरकीपणा रंगवला. पण याशिवाय असेही काही चित्रपट त्यांच्या नावे जमा झाले, जे त्यांच्या कारकिर्दीला वळण देणारे ठरले. रामदास फुटाणेंची निर्मिती असलेला, डॉ. जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला आणि विजय तेंडुलकरांच्या लेखणीने सजलेला 'सामना' हा चित्रपट होता. निळू फुले यांच्या संवादांसह, अभिनयासह अनेक कारणांनी हा चित्रपट गाजला. या चित्रपटातील भूमिकेसाठी त्यांना अभिनयाचा राज्य पुरस्कार मिळाला.

'सिंहासन' या चित्रपटातून त्याचे वेगळे रूप समोर आले. राजकारणावर आधारित असलेल्या या चित्रपटात 'दिगू टिपणीस' ही पत्रकाराची भूमिका निळू फुले यांनी केली. स्वत:च्या चिंतनातून, समाजकारणातील तसेच राजकारणातील जाणिवेतून त्यांनी दिगूची भूमिका प्रत्यक्ष उभी केली.

निळू फुले यांनी साधारणपणे दोनशे चित्रपट केले. त्यामध्ये 'सोंगाड्या', 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी', 'शापित', 'जैत रे जैत', 'थापाड्या', 'हऱ्या नाऱ्या झिंदाबाद', 'पिंजरा', 'गाव तसं चांगलं पण वेशीला टांगलं', 'सोबती', 'पुढचं पाऊल', 'आई', 'चोरीचा मामला', 'पोरींची धमाल बापाची कमाल', 'पैंजण', 'भालू', 'सर्वसाक्षी', 'भुजंग', 'नाव मोठं लक्षण खोटं', 'आयत्या बिळावर नागोबा', 'एक होता विदूषक', 'साने गुरुजी' अशा चित्रपटातल्या निरनिराळ्या भूमिकांनी प्रेक्षकांनी निळूभाऊंना मनामध्ये जागा दिली. सामाजिक वास्तव मांडणारा 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' (२००९) हा निळू फुले यांचा शेवटचा चित्रपट ठरला.

त्यांनी 'सोबत' या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते तसेच या चित्रपटाचे संवाद व पटकथाही त्यांनी स्वत: लिहिली होती. मराठी चित्रपटांबरोबरच काही हिंदी चित्रपटातही निळू फुले यांनी भूमिका केल्या. दिलीपकुमार यांच्याबरोबर 'मशाल', अमिताभ बच्चन यांच्याबरोबर 'कुली', अनुपम खेर यांच्यासह 'सारांश' असे महत्त्वपूर्ण चित्रपट त्यांनी केले.

'एक मुट्ठी चावल', 'प्रेम प्रतिज्ञा', 'वो सात दिन' यांसारख्या हिंदी चित्रपटातूनही त्यांनी काही छोट्या पण लक्षणीय भूमिका केल्या.

'धग' या उद्धव शेळके यांच्या कादंबरीवर तसेच जयवंत दळवी यांच्या 'धर्मानंद' या कादंबरीवर निळू फुले यांना चित्रपट काढायचे होते. भंडारा जिल्ह्यात घडलेल्या सत्य घटनेवर आधारित 'खैरलांजी' या चित्रपटाची निर्मिती त्यांना करायची होती, पण त्यांचे हे स्वप्न अपूर्ण राहिले.

प्रतिभासंपन्न असलेला हा अभिनेता अत्यंत साधा, सत्शील, नि:स्वार्थी आणि माणूस म्हणून मोठा होता. आपल्या सहज आणि स्वाभाविक भूमिकांना न्याय देत जवळपास चाळीस वर्षेचित्रपटसृष्टीमध्ये प्रसंगी तीन–तीन शिफ्टमध्ये निळू फुले काम करत राहिले. विविध पुरस्कारांच्या रूपाने आणि रसिकांच्या प्रेमापोटी त्यांना त्यांच्या या भरीव योगदानाची पावती मिळाली.


'सामना' आणि 'चोरीचा मामला' या चित्रपटातील भूमिकांना विशेष उल्लेखनीय भूमिकेचा पुरस्कार मिळाला तसेच 'अजब तुझे सरकार' यामधील भूमिकेसाठी आणि 'सासुरवाशीण' चित्रपटातील भूमिकेसाठीही महाराष्ट्र शासनाच्या विशेष पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. समाजकार्य व अभिनय अशा दोन्ही क्षेत्रात समरसून काम करणारा एक सक्षम कलावंत कर्करोगाच्या विकाराने काही काळग्रस्त झाला.

निळू फुलेंनी वयाच्या अठ्ठ्याहत्तराव्या वर्षी लौकिक आयुष्याचा निरोप घेतला. स्वत: मी कसा श्रेष्ठ आहे हे सांगणं मला जमणार नाही. त्यामुळे मी आत्मचरित्र कधी लिहिणार नाही असे म्हणणाऱ्या निळूभाऊंनी स्वत:विषयी खरोखरच काहीही लिहिले नाही. निळू फुले यांचे १३ जुलै २००९ रोजी निधन झाले.

**–संजीव वेलणकर**

# क्रिकेटपटू बापू नाडकर्णी

बापू उर्फ रमेशचंद्र गंगाराम नाडकर्णी यांचा जन्म ४ एप्रिल १९३३ रोजी झाला. सर्वोत्तम अष्टपैलू क्रिकेटपटूंपैकी ते एक होते. त्यातही जगातला सर्वांत कंजूष फिरकी गोलंदाज म्हणून ते परिचित होते. १९५५ ते १९६८ यादरम्यान ते भारतीय कसोटी संघात होते. जन्माने नाशिककर असलेले बापू १९५०–५१मध्ये पुणे विद्यापीठाकडून रोहिंग्टन बरिया चषकात खेळले. त्यानंतर १९५१–५२मध्ये महाराष्ट्राच्या संघातून त्यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. दोन वर्षांनंतर ब्रेबॉर्न स्टेडियमवर तेव्हाच्या बॉम्बे संघाविरुद्ध त्यांनी आपले पहिले शतक झळकावले. १०३ मिनिटांच्या खेळीत त्यांनी हे शतक साकारले होते. प्रथमश्रेणी क्रिकेटमधील सातत्यपूर्ण अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर त्यांनी भारतीय संघात स्थान मिळवले.



फिरोजशहा कोटला मैदानावर १६ डिसेंबर १९५५ रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात बापूंनी आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये पहिले पाऊल ठेवले. वीनू मंकड यांना विश्रांती देऊन बापूंना संधी देण्यात आली होती. मंकड संघात परतल्यानंतर बापू स्वत:हून संघाबाहेर राहिले होते. त्याचवर्षी त्यांच्याकडे महाराष्ट्र संघाची धुरा सोपवण्यात आली होती. दरम्यान, पुढच्या काळात बापूंनी भारतीय संघातील आपले स्थान पक्के केले. भारतीय क्रिकेट संघाकडून बापू ४१ कसोटी सामने खेळले. त्यात त्यांनी ८८ बळी टिपले व फलंदाजीतही उपयुक्त योगदान दिले. एक शतक व सात अर्धशतकांसह एक हजार ४१४ धावा त्यांच्या नावावर आहेत. विशेष म्हणजे शेवटचा कसोटी सामनादेखील बापू न्यूझीलंडविरुद्ध खेळले. सात ते १२ मार्च १९६८ रोजी ऑकलंड येथे हा सामना खेळवला गेला होता.

कसोटीत सलग २१ षटके निर्धाव टाकण्याचा विश्वविक्रम बापूंनी १४ जानेवारी १९६४ रोजी इंग्लंडविरुद्ध रचला होता. चेन्नईच्या मैदानावर हा सामना झाला होता. बापू डाव्या हाताने फिरकी गोलंदाजी करायचे. इंग्लंडविरुद्धच्या या सामन्यात त्यांनी ३२ षटके टाकली. त्यातील तब्बल २७ षटके निर्धाव होती. ३२ षटकांत त्यांनी १.६७च्या सरासरीने केवळ पाच धावा दिल्या होत्या. बापूंचा हा विश्वविक्रम अबाधित राहिला. बापूंच्या गोलंदाजी सरावाचीही तेव्हा नेहमी चर्चा असायची. नेटमध्ये सराव करताना नाणे ठेवून ते सराव करायचे. नाण्याचा अचूक वेध घेऊन मारा करण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यातूनच त्यांच्या फिरकीने भल्याभल्या फलंदाजांची फिरकी घेतली. बापू नाडकर्णी यांचे निधन १७ जानेवारी २०२० रोजी झाले.

**(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)**

# पावसाळापूर्व कामांबाबत प्रशासनाला निर्देश

## दिघा विभागातील सुविधांची आयुक्तांनी केली पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत समितीचे अध्यक्ष म्हणून नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पावसाळापूर्व कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून त्या अनुषंगाने त्यांनी दिघा विभागामध्ये प्रत्यक्ष पाहणी करत सुरू असलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

यामध्ये त्यांनी ग्रीन वर्ल्ड पाठीमागील मोठया नाल्याची पाहणी करत त्याची व्यवस्थित साफसफाई करण्याच्या सूचना दिल्या तसेच नाल्याच्या बाजूस एमआयडीसीच्या जागेत मोठया प्रमाणावर डेब्रीज पडत असल्याचे लक्षात घेत त्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने एमआयडीसीला याकामी महापालिकेमार्फत सहकार्य करून ते थांबवावे असे निर्देशित करण्यात आले.

दिघागाव रेल्वे स्टेशन समोरील मुकंद कंपनी जवळील अंडरपासच्या ठिकाणी नागरिकांना चालण्यास त्रास होउु नये व त्याठिकाणी पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या दूर व्हावी या दृष्टीने रस्त्यापासून काहीसा उंचावर बांधण्यात आलेला पदपथ नागरिकांच्या सोयीचा असल्याचे लक्षात घेत तो पदपथ पुढे साठेनगरपर्यंत



वाढवावा व त्याबाजूची कुंपणभिंतही पुढे वाढवावी तसेच यामध्ये अडथळा आणणारे अतिक्रमण हटवावे, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

ग्रीन वर्ल्डसमोरील बाजूस रेल्वे रुळांशेजारी नाल्याच्या बाजूला असलेल्या दुर्लक्षित जागेची नीटनेटकी स्वच्छता करुन त्याठिकाणी सुशोभिकरण करावे तसेच ठाणे बेलापूर रस्त्याचा त्याठिकाणी खंडीत झालेला पदपथ पुढे मुकंद अंडरपासपर्यंत पूर्ण करावा आणि पादचाऱ्यांना अडथळामुक्त चालता यावे अशी सोय करावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले. याकरिता त्याठिकाणी असलेला पंपही शेजारील उद्यानाच्या कोपऱ्यात स्थलांतरीत करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. त्याठिकाणचे सामुदायिक शौचालय काढून तेथे आरसीसी शौचालय उभारण्याचेही आयुक्तांनी सूचित केले.

दिघा माता बाल रुग्णालयाच्या कामाची पाहणी करतांना आयुक्तांनी कामाला गती देण्याचे व रात्रंदिवस नियोजनबध्द कामे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्याशेजारील जलकुंभाचे कामही जलद पूर्ण करुन मोरबे धरणाचे पाणी दिघ्यापर्यंत पोहचण्याच्या दृष्टीने आवश्यक चाचण्या करून घ्याव्यात, असे निर्देश दिले.

शहरातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता काटेकोरपणे करण्याचे निर्देशित करीत विशेषत्वाने दिघा ते ऐरोली चिंचपाडयापर्यंत ठाणे बेलापूर मार्गावर दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते हे लक्षात घेत पोलिसांच्या मदतीने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. ठाणे बेलापूर मार्गावर दिघाबाबा देवस्थानसमोरील दुर्लक्षित जागा स्वच्छ करुन त्याठिकाणी सुशोभिकरण करावे व त्या संपूर्ण रस्त्यावर पदपथ चालण्यायोग्य व्यवस्थित करावे आणि त्यामध्ये अडथळा येणारे अतिक्रमण दुर करावे, असे स्पष्ट सूचना योवळी देण्यात आल्या.

१५ मे पर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या वेळी शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, परिमंडळ २ उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड, परिमंडळ २ घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त संतोष वारूळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## जातनिहाय जनगणना; भाजपकडून जल्लोष

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाती निहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निमित्ताने दोघांचे आभार व्यक्त करत भाजपचे सानपाडा जुईनगर मंडळ अध्यक्ष सुनील कुरकुटे यांनी भाजप कार्यकर्त्यांसह शनिवारी सकाळी जल्लोष साजरा करत मिठाई पेढे वाटप केली.

या वेळी भाऊ भापकर, राजेश ठाकूर, शैला पाटील, जगदीश पाटील, पांडुरंग आमले, स्नेहा पवार, संगिता माळवे, रंजना चिलवते, स्वाती जाधव, जयश्री ताजणे, आरती वेतकर, भाग्यश्री महाडीक, संगिता मतकरी, कल्पना जाधव, माय पदरे, आशा धूळे, प्रणाली आपटे, शैला कपते, मनाली सावंत तसेच भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातीनिहाय जनगणना करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यानिमित्ताने सानपाडा जुईनगर मंडळाच्या वतीने विभागातील नागरिकांना मिठाईचे वाटप केले. देशात अनेक समाजांची, लोकांची अशी मागणी होती की जातनिहाय जनगणना व्हावी. जनतेच्या मागणीला प्रतिसाद देत गृहमंत्री अमित शहा यांनी जातीनिहाय जनगणनेची घोषणा केली आहे. त्याबद्दल पंतप्रधान मोदींचे आभार मानतो. त्याकरिता हा जल्लोष साजरा केला आहे असे भाऊ भापकर यांनी याप्रसंगी सांगितले. तर भाजप सानपाडा जुईनगर मंडल अध्यक्ष सुनील कुरकुटे यांनी जातीनिहाय जनगणना करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतल्याना सर्व घटकाना न्याय मिळेल, असे सांगितले.

## निवडक

### दागिन्यांची पिशवी चोरली

**पनवेल :** शहरातील झवेरी बाजार येथे दागिने दुरुस्त करण्यासाठी आलेल्या एका महिलेच्या सोन्याच्या दागिन्यांच्या पिशवीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली असून त्यामध्ये जवळपास तीन लाख २१ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. बोनशेत येथे राहणारी सदर महिला ही पनवेल शहरातील झवेरी बाजार येथे दागिने दुरुस्त करण्यासाठी आली असता दागिने दुरुस्ती करून घेतल्यानंतर ती महिला नवरंग स्टोअर्स येथे घरगुती सामान खरेदी करण्यासाठी गेली. स्टोअर्समधील गर्दीचा फायदा घेवून अज्ञात चोरट्याने तिच्या हातातील दागिने असलेली काळ्या रंगाची पिशवी चोरुन तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कामगार दिन उत्साहात साजरा

**पनवेल :** आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून सिमेन्स वर्कर्स युनियन, कोपरी, ठाणेने आंतरराष्ट्रीय



कामगार दिन व महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. या वेळी सिमेन्स वर्कर्स संघटनेचे अध्यक्ष मनोज बोडके, उपाध्यक्ष्य जयंतीलालला गुप्ता, सहचिटणीस भास्कर कोतवाल, सेक्रेटरी महादेव गेजगे, सांस्कृतिक विंग अध्यक्ष राकेश मांजरेकर, युनिट सेक्रेटरी, शिनोज नायर, विश्वनाथ चिर्लेकर व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ठाणे विभागाचे प्रमुख नितीन पाटील, कामगार कल्याण केंद्र प्रमुख, उल्हास नगर, वीणा तरेकर, शहाड केंद्र संचालक, गजेंद्र आहेर, वर्तक नगर, ठाणे, केंद्र प्रमुख प्रवीण सकट, पनवेल केंद्र प्रमुख, दयानंद कदम, व गुणवंत कामगार, अरविंद मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### सत्याग्रह महाविद्यालयात महाराष्ट्र दिन

**नवी मुंबई :** खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या



प्रांगणात महाराष्ट्र आणिकामगार दिनानिमित्त राष्ट्रध्वज वंदन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सेक्टर-१९, खारघर, नवी मुंबई येथे झाले. जेष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी राष्ट्रध्वज फडकावला. या वेळी प्रा. संगीता जोगदंड यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा इतिहास सांगितला.
प्रा जोगदंड, प्रा. शिवाजी आमटे प्रा. सतीश पवार, प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी आपले विचार मांडले. सुजाता भोसले यांनी आभार मानले.

### वाशीत महाराष्ट्र दिन साजरा

**नवी मुंबई :** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त, १ मे रोजी वाशी येथील नवी मुंबई महापालिकेच्या फर्स्ट रेफरल युनिट रुग्णालयात अभिमानाने साजरा करण्यात आला. या वेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश म्हात्रे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून समारंभाची सुरुवात झाली. डॉ. माधवी इंगळे, डॉ. राजेश ओतुरकर, डॉ. प्रकाश राठोड, डॉ. भानू मुळकीकर, डॉ. सचिन वाघमारे आणि मॅट्रन रिचेल पटनीगिरी आदि मान्यवर यांनी ध्वजास मानवंदना दिली. या कार्यक्रमात राष्ट्रगीत आणि राज्यगीत गायन, त्यानंतर मिठाई वाटप करण्यात आले.

### नाईक विद्यालयात महाराष्ट्र दिवस

**नवी मुंबई :** रा. फ.नाईक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय कोपरखैरणे येथे १ मे महाराष्ट्र दिवस आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिवस निमित्ताने खूप उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला. संस्थेच्या प्रथा आणि नियमानुसार, सेवा निवृत्त होत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा मान संस्थचे वरिष्ठ लिपिक रोहिदास पाटील यांना देण्यात आला. सर्व विभागांचे प्रमुख मुख्याध्यापक, प्रिन्सिपल, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक,शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी,शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख हे उपस्थितीत होते. संदेश ढगे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी आभार मानले.

## टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू; दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पत्नी व मेहुणीसह जाणाऱ्या तरुणाच्या दुचाकीला भरधाव टँकरने धडक दिली. या अपघातात दुचाकी चालवणाऱ्या तरुणाचा मृत्यू; तर त्याची पत्नी व मेहुणी या दोघी गंभीर जखमी झाल्याची घटना सायन-पनवेल मार्गावरील कळंबोली येथील पुलावर घडली.

या अपघातात प्रदीप चंद्रकांत कांबळे (वय ३२) याचा मृत्यु झाला असुन त्याच्या पत्नी अंजली कांबळे (वय २६) व मेहुणी ज्योती गिरजू किर्वे (वय २४) जखमी झाल्या आहेत प्रदीप हा बदलापूर येथील शिरगावात; तर त्याची मेहुणी ज्योती कामोठेमध्ये राहण्यास आहे. प्रदीप बुधवारी कामानिमित्त पत्नीसह खारघर येथे आला होता; तर त्याची मेहुणी ज्योतीदेखील आली होती.

सायंकाळी प्रदीप व त्याची पत्नी अंजली हे दोघेही ज्योतीला कामोठे येथील घरी सोडण्यासाठी निघाले होते. प्रदीप दुचाकीवरून पत्नी व मेहुणीला घेऊन खारघर येथून कामोठे येथे जात होता. दरम्यान, ते सायन-पनवेल मार्गावरील तळोजा फाटा येथील उड्डाणपुलावर आले असता पाठीमागून येणाऱ्या भरधाव टँकरची त्यांच्या दुचाकीला धडक लागली. यात प्रदीपचा जागीच मृत्यू झाला; तर त्याची पत्नी व मेहुणी गंभीर जखमी झाल्या आहेत.

## व्यावसायिकाची फसवणूक

**पनवेल** : खारघर परिसरात राहणाऱ्या व्यावसायिकाची ६६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. अधिक नफा मिळवण्याच्या उद्देशाने त्यांनी गुंतवणूक केली होती, मात्र गुंतवलेले पैसे परत न करता संबंधितांनी त्यांची फसवणूक केली. शिपिंग व्यवसायाशी संबंधित असलेल्या या व्यक्तीला व्हॉट्सअॅपवर ऑनलाईन ट्रेडिंगबद्दल माहिती मिळाली होती. गुंतवणुकीतून मिळणार्या नफ्यावर विश्वास ठेवून त्यांनी टप्प्याटप्प्याने ६५ लाख ९४ हजार रुपये गुंतवले होते, मात्र पैसे भरल्यानंतर त्यांना ना कोणता मोबदला मिळाला ना गुंतवलेली रक्कम परत मिळाली. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले असता सायबर पोलिसांकडे तक्रार केली. त्यावरून अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे.

## जबरी चोरी उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या २४ तासात जबरी चोरी उघडकीस आणून आरोपीला अटक केली आहे.

यातील फिर्यादी या नारळ पाणी घेण्यासाठी पायी जात असताना रोड नंबर एक भगत शेठ यांचे घराजवळ सेक्टर १२ नवीन पनवेल या ठिकाणी अटक आरोपी आकाश गोपाळ गाडे (वय २२) याने फिर्यादी यांचे पाठीमागून जाऊन फिर्यादीस तोंडावर दगडाने इच्छापूर्वक दुखापत करून फिर्यादी यांचे गळ्यातील ३५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन अंदाजे किंमत ८३ हजार ही जबरीने खेचून चोरून नेली होती.

याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप बंडगर, पो.हवा. महेश कांबळे, भाऊराव बाचकर, धीरेंद्र पाटील, पो. शि. सचिन सरगर आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपीला अवघ्या २४ तासात अटक केली आहे. त्याच्याकडून चोरलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

## मंत्री डॉ. अशोक उईके यांचा रानसई, सारसई येथे आदिवासींसोबत संवाद





**उरण : रामप्रहर वृत्त**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी उरण मतदारसंघातील रानसई आणि सारसई येथे आदिवासी संवाद मेळाव्यांचे आयोजन करून आदिवासी बांधवांशी थेट संवाद साधला. या मेळाव्यात त्यांनी आदिवासींच्या समस्या जाणून घेतल्या आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहचवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी उपस्थित होते. रानसई येथे झालेल्या मेळाव्यात मंत्री उईके यांनी आदिवासी बांधवांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी जातीच्या प्रमाणपत्रांसह इतर योजनांची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

कामगार नेते जितेंद्र घरत, राणसईच्या सरपंच राधा पारधी, सुरेश पारधी, अजित पाटील, गपू पाटील, समीर मडवी, सुनील गावडी, नारायण बरतोड, बाळाराम चौधरी, नामदेव पारधी, मधुकर पारधी, विद्याधर जोशी, गणेश पाटील, कलाकार टाकले, विजय मुरकुडे, शेखर कानडे, जीवन टाकले, नितेश खारकर, अमर म्हात्रे, रूपेश धुमाल आणि वामन म्हात्रे आदी उपस्थित होते.

तरसारसई येथे झालेल्या संवाद मेळाव्यात मंत्री उईके यांनी आदिवासी बांधवांना मार्गदर्शन केले. या ठिकाणी त्यांच्या हस्ते न्यूक्लिअस बजेट योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लोककला साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, किराणा दुकान सामान खरेदी, तांदूळ काढणी मशिन, पिठगिरणी खरेदी, मत्स्यपालन आणि विविध व्यवसायांसाठी अर्थसाहाय्याचे धनादेश लाभार्थ्यांना देण्यात आले. यासोबतच, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पणही त्यांच्या हस्ते करण्यात आले. वृक्षारोपणही करण्यात आले.

या मेळाव्यात पनवेल तालुका दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उलवे मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, डॉ. अविनाश गाताडे, कराडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विजय मुरकुटे, संजय टेंबे, रत्नाकर घरत, जीवन टाकले, दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील, साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल, विद्याधर जोशी आदी उपस्थित होते.

## करंजाडेतील समस्यांसंदर्भात सिडकोला निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे शहरातील विविध समस्या संदर्भात कळंबोली येथील सिडको कार्यालयात मुख्य कार्यकारी अभियंते मिलिंद रावराणे साहेब यांची भेट घेण्यात आली. या बैठकीत शिवसेना उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे आणि करंजाडे शिवसेना शहरप्रमुख मिरेंद्र शहारे यांनी सहभाग घेतला.

बैठकीदरम्यान करंजाडे शहरातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये रस्त्यांची कामे: करंजाडेतील उर्वरित अंतर्गत रस्ते व सेक्टर-१, २, २अ मधील रस्त्यांबाबत चर्चा झाली. सदर कामांसाठी शॉर्ट टेंडर प्रक्रियेद्वारे लवकरच काम सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली.

स्पीड ब्रेकर: सेक्टर-५ व ६ मधील रस्त्यांवर वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पीड ब्रेकर तयार करण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले असून, लवकरच त्यावर काम सुरू करण्यात येईल, असे सांगण्यात आले.



गार्डन, खेळाची मैदाने व गटार सफाई: शहरातील उद्याने, खेळाच्या मैदानांची देखभाल, मान्सूनपूर्व गटारांची स्वच्छता आणि इतर विविध विकासकामांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. या कामांवर लवकरात लवकर कार्यवाही व्हावी, यासाठी आग्रह धरण्यात आला.

करंजाडे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सिडको प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, येत्या काळात या प्रयत्नांना सकारात्मक फलश्रुती मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.



**उरण : पंचायत समिती, तहसील कार्यालय, नगर परिषद आदी शासकीय कार्यालयात महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

## डीपीएस फ्लेमिंगो तलाव पुन्हा गुलाबी रंगाने फुलला!

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे खाडीतून एका नाल्याला जोडणाऱ्या दोन जलवाहिन्यांचे दुरुस्तीनंतर ३० एकरच्या पाणथळ जागी आंतर-भरतीचे पाणी पूर्ण ताकदीने शिरल्याने डीपीएस फ्लेमिंगो तलाव पुन्हा एकदा उत्साहाने भरला आहे.

नवी मुंबई पालिकेने (एनएमएमसी) स्वार्थ साधणाऱ्यांनी अडवलेल्या जलवाहिन्या यशस्वीरित्या साफ केल्या आहेत आणि आता पाणी आत-बाहेर वाहत आहे.

जानेवारी-मे २०२४ मध्ये पक्ष्यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर फ्लेमिंगो डेस्टिनेशनचे संवर्धन करण्याच्या मार्गांवर काम करणाऱ्या उच्चस्तरीय समितीने केलेल्या शिफारशींचा हा एक भाग आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

तलाव पुनर्संचयित करण्यात उत्सुकता दाखवणारे वनमंत्री गणेश नाईक यांनी यापूर्वी एनएमएमसी आणि सिडको अधिकाऱ्यांना दोन्ही जलवाहिन्यांमधील अडथळे साफ करण्यास सांगितले होते. एनएमएमसी अभियंत्यांनी केवळ अडथळे साफ



केले नाहीत तर पाईप्स खाली केले आहेत जेणेकरून भरती-ओहोटीच्या प्रवाहासोबत पाणी आत आणि बाहेर पडेल.

समितीच्या सूचनेनुसार, राज्य सरकारने अलिकडेच डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे, असे कुमार म्हणाले आणि राजपत्रित आदेशाद्वारे ते औपचारिक करण्याची गरज यावर भर दिला.

आम्हाला आशा आहे की शहरात लवकरच पूर्ण फ्लेमिंगो पर्यटन होईल, कुमार म्हणाले. गोड्या पाण्याच्या प्रवाहामुळे, शेकडो फ्लेमिंगो तलावात परत येऊ लागले आहेत ज्यामुळे पक्षी निरीक्षकांना त्यांचे मोबाइल आणि डीएसएलआर कॅमेरे घेऊन पाणथळ जागेत गर्दी करायला आवडली. हे असे दृश्य आहे जे पाहण्याची आम्हाला उत्सुकता होती, असे उत्साही पक्षी निरीक्षक सतीश डबराल म्हणाले.

आम्हाला खात्री आहे की साचलेल्या पाण्याने घाणेरडे असलेले एनआरआय पाणथळ जागा देखील संवर्धन राखीव म्हणून घोषित केली जाईल, असे लेखक-लेखक जयंत हुदर म्हणाले. नाईकच्या प्रयत्नांमुळे, नवी मुंबई केवळ फ्लेमिंगो शहराच्या टॅगला समर्थन देऊ शकणार नाही तर गुलाबी रंगही मिळवेल, असे नवी मुंबई पर्यावरण संवर्धन सोसायटी (एनएमईपीएस) चे संदीप सरीन म्हणाले, जे पाणथळ जागा वाचवण्यासाठी कायदेशीर लढा देत आहेत.

# जातनिहाय जनगणना निर्णयाचे कर्जतमध्ये भाजपकडून स्वागत




**कर्जत : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे कर्जत शहरात भाजपच्या माध्यमातून जोरदार स्वागत करण्यात आले.

जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केल्यावर या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी कर्जत शहरातील लोकमान्य टिळक चौकात भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये भाजप कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश लाड, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, चिटणीस रमेश मुंढे, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष बिनिता घुमरे, स्नेहा गोगटे, कर्जत शहर अध्यक्ष शर्वरी कांबळे, सोशल मीडिया जिल्हा संयोजक ॲड गायत्री परांजपे, तानाजी चव्हाण, प्रशांत उगले, सुषमा ढाकणे, बळवंत घुमरे, दीपक वैद्य, अतुल बडगुजर, सर्वेश गोगटे, नितीन दगडे, सचिन ओसवाल आदींचा समावेश होता.

कर्जत शहर मंडळ अध्यक्ष राजेश लाड यांनी जातनिहाय जनगणनेचे सामाजिक आणि राजकीय महत्त्व उपस्थितांसमोर मांडले. जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी, स्वातंत्र्यानंतर आजवर देशात योग्य पद्धतीने जातनिहाय जनगणना झालेली नाही आणि आता केंद्र सरकारने ही पावले उचलून समाजातील सर्व स्तरांचा न्याय सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. २०२१मधील जनगणना कोरोना महामारीमुळे होऊ शकली नव्हती. आता होणाऱ्या जनगणनेत ओबीसी समाजाचीसुद्धा आकडेवारी जाहीर होणार आहे, असे सांगितले.

# नेरळमध्ये एकाच रात्रीत पाच दुकाने फोडली

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील मुख्य बाजारपेठेत दुकाने फोडून चोरी करण्याच्या घटना घडल्या. एकाच रात्री पाच दुकाने फोडण्यात आली. तीन मेडिकल स्टोअर तसेच एक चप्पल बुटाचे आणि एक बियर शॉपी अशी पाच दुकाने फोडल्याने नेरळ पोलिस चक्रावले आहेत. गेली अनेक दिवस चोरीची मालिका सुरु असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३० एप्रिल रोजी मध्यरात्री नेरळ बाजारपेठ भागातील १०० मीटर परिघातील चार दुकाने फोडून किरकोळ चोरी केली. नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील नेरळ बाजारपेठेतील अंबिका नाका आणि जुनी बाजार पेठ चार दुकान फोडून रोख रक्कम आणि इतर मुद्देमाल असा सुमारे ३५ हजार रूपयांची रोकड लंपास केली. दोन ते अडीच वाजण्याचे सुमाराच माथेरान नेरळ रस्त्यावरील तीन तर जुने बाजारपेठ भागातील एक अशी चार आणि नेरळ एसटी स्टँड भागातील एक मेडिकल स्टोअर मध्ये चोरीची घटना घडली. अंबिका भुवन नाक्याजवळील एमआरटी कॉम्प्लेक्समधील एका रांगेतील तीन दुकानांचा समावेश आहे. त्यात न्यू राज नावाचे वाईन आणि बियर शॉप मधील गल्ल्यातील पाच हजार रुपयाची रोकड तसेच बियर आणि वाईनच्या बाटल्या तसेच मोबाईल असा २५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.जीएन शूज शॉपमधून १०० रूपयांची चिल्लर तसेच तेथील केक शॉपमध्ये चोरी झाली पण काहीही चोरीला गेले नाही.

नेरळमधील जुन्या बाजारपेठेतील डॉ. लाड यांच्या क्लिनिकसमोरील अंबिका मेडिकल अँड जनरल स्टोअरमध्येही चोरी झाली असून, सहा हजार रुपये रोख आणि काही परफ्युम्स चोरून नेण्यात आले आहेत. या मेडिकल दुकानातील सीसीटिव्ही कॅमेरे मध्ये सदर चोरीची घटना कैद झाली असून त्यानुसार पोलीस तपास करू लागले आहेत. तसेच या रात्रीमध्ये नेरळ पूर्व भागातील आणखी एक दुकानातही चोरी झाल्याचे समोर आले आहे. या सर्व चोरीच्या घटना बाबत नेरळ पोलीस शोध घेत असून अधिक तपास सुरु आहे.

## माणगाव ते इंदापूरदरम्यान वाहनांच्या रांगा

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

शाळेला उन्हाळी सुट्ट्या लागल्या असून कोकणातील मुंबईचे चाकरमनी हे बुधवार पासून एस.टी.तसेच आपली खाजगी वाहने घेऊन तळ कोकणात निघाले आहेत.इंदापूर ते माणगावदरम्यान त्यांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे.



इंदापूर बाजारपेठतून सिंगल रस्ता असल्यामुळे हॉटेल रायगड दरबार ते रुद्रवली अशा दोन ते तीन किलोमीटर लांब वाहनाच्या रांगा लागलेल्या दिसत असून यामध्ये लहान मुले, महिला वर्ग,वय वृद्ध माणसासांचे मोठे हाल होताना दिसत आहेत. या वाहतूक कोंडीमध्ये अनेक रुग्णवाहिका अडकून पडल्या होत्या. सर्व ठिकाणी वाहने थांबल्यामुळे रुग्णवाहिकेस कोणत्याही बाजूने जाण्यास मार्ग उरला नव्हता. खूप वेळ या रुग्णवाहिका सायरन वाजवत एकाच ठिकाणी उभ्या होत्या.

मुंबई गोवा महामार्गा अनेक ठिकाणी हा रस्ता अपूर्ण अवस्थेत आहे. काही ठिकाणी रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे रस्ता अरुंद होतो. शिवाय अनेक ठिकाणी डायव्हर्जनदेखील आहेत. परिणामी महामार्गावर वाहने वाढल्यावर मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होते. कोंडी लवकर सोडवण्यासाठी महामार्गाचे काम जलद पूर्ण करावे अशी मागणी प्रवासी, नागरिकांकडून होत आहे.

## सासवणे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य बडतर्फ

**अलिबाग : प्रतिनिधी**

सासवणे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सात सदस्य यांची पदावरून बडतर्फी करण्यात आली आहे. कोकण आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी हे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायतच्या कामकाजात आर्थिक अनियमित आढळल्याने ही कारवाई करण्यात आली.

सत्यवान गजानन कोळी यांनी या संदर्भातील अपील कोकण आयुक्त यांच्याकडे केले होते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८च्या कलम ३९(१) नुसार ही कारवाई करण्यात आली. ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी सन २०२१-२२ या कालावधीत ग्रामपंचायतच्या खात्यातून सेल्फने काढून नंतर मजुरांना रोखीने रकमा अदा केल्याचे दिसून आले. आर्थिक आणि प्रशासकीय स्वरूपातील अनियमित लक्षात घेऊन कोकण आयुक्तांनी जिल्हा परिषदे कडून या प्रकरणाची चौकशी करून अहवाल मागवला होता.

ग्रामपंचायत सरपंच आणि सरपंच तसेच इतर सदस्य यांच्याकडून आर्थिक अनियमितत्ता झाल्याचे सिद्ध झाले. या अहवालानंतर कोकण आयुक्तांनी सासवणे ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य यांना पदावरून काढून टाकण्याचे आदेश जारी केले आहेत.

## महाजॉब फेअर

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, शेडूंगच्या वतीने ६ व ७ मे रोजी महाजॉब फेअरचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळा सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत विद्यापीठाच्या परिसरात होणार आहे.

या उपक्रमात ८९ नामवंत कंपन्या सहभागी होणार असून त्या सहा हजारांहून अधिक रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड करतील, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रा. केसरीलाल वर्मा यांनी दिली.

## पेण राष्ट्रवादीतर्फे मूल्यमापनाचा जल्लोष



**पेण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत मूल्यमापनाचा निकाल जाहीर करण्यात आला आहे त्यानुसार महिला व बालविकास आदिती तटकरे यांच्याकडे असलेल्या महिला व बालविभागाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

यावेळी पेण तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे फटाक्याची आतजबाजी करून आदिती तटकरे तुम आगे बडो पेण तालुका आपके साथ है घोषणा देत जल्लोष साजरा केला या वेळी पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच आदिती तटकरे यांची रायगडच्या पालकमंत्रीपदी निवड करावी, अशी मागणी करण्यात आली.

या वेळी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर तालुकाध्यक्ष दयानंद भगत, जिल्हा वकील सेल अध्यक्ष मंगेश नेने, तालुका उपाध्यक्ष महेंद्र वर्तक पेण, विधानसभा सचिव प्रभाकर लांगी पेण तालुका सचिव नरेंद्र म्हात्रे वडखळ जिल्हा परिषद अध्यक्ष राजा वर्तक, तालुका सरचितणीस अजित ठाकूर, प्रदीप म्हात्रे पाबळ जि.प. अध्यक्ष प्रभाकर निगावाले जिल्हा महिला चिटणीस मीनाक्षी पाटील, शहर महिला अध्यक्ष सुचिता चव्हाण, तालुका महिला उपाध्यक्ष जयश्री पाटीलअमित कुंभार, तालुका महिला उपाध्यक्ष सुनीता घरत, पेण शहर युवती अध्यक्ष मुस्कान झटाम, आनंद जाधव, शेखर पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# वाशी हवेली ग्रामपंचायतीने राबविले कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ करू अभियान



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रामपंचायत वाशीहवेली ग्रामपंचायत येथे कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेऊ या अभियानाचा शुभारंभ गटविकास अधिकारी, पंचायत समिती तळा महादेव शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले,

सदर वेळी अभियान व कंपोस्ट खड्डा भरणेबाबत गटविकास अधिकारी महादेव शिंदे, सहा.गटविकास अधिकारी नीता खोटरे,विस्तार अधिकारी पुष्पा नेरकर, नंदू मुंढे,श्री.झोरे ग्रामपंचायत कर्मचारी,ग्रामपंचायत अधिकारी अश्विनी धुत्रे,तसेच उपस्थित ग्रामस्थांना महिला यांना कंपोस्ट खत खड्ड्याबाबत कचऱ्या बाबत चर्चा करून माहिती देऊन मार्गदर्शन केले. या वेळी माजी सरपंच जगन्नाथ तांडेल व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# अलिबागमध्ये आमदार महानाट्य करंडक स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

कलारंग संस्थेतर्फे आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण नाट्य कलाकारांची 'आमदार महानाट्य करंडक २०२५ दोन अंकी नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ११ ते १५ मे या कालावधीत ही स्पर्धा अलिबागमध्ये होणार आहे.

गुरुवारी (दि. १) या स्पर्धेच्या करंडकाचे अनावरण आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी सभागृहात हा समारंभ पार पडला. ग्रामीण भागातील नाट्यकर्मींना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे. ग्रामीण भागातील नाट्यकर्मींना आपण सर्व सहकार्य करु. या राजकारण केले जाणार नाही. कलाकारांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा मी प्रयत्न करेन, असे आश्वासन आमदार महेंद्र दळवी यांनी यावेळी दिले. ॲड. प्रसाद पाटील यांनी कलाकारांना भाषेवर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला दिला.

संजीवनी नाईक, तृप्ती पाटील, शैलेश चव्हाण, दिपक रानवडे, अर्जुन पाटील, संतोष निगडे, भाग्यता पाटील, जान्हवी पाटील, तनुजा घरत, महेश शिंदे, महेश कोटियान, रंजीता शिंदे तसेच अलिबाग मधील ज्येष्ठ नाट्य कलाकार ग्रामीण मंडळाचे कलाकार तसेच नाट्यप्रेमी यावेळी उपस्थित होते. कलारंगचे अध्यक्ष प्रकल्प वाणी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. किरण सोष्टे यांनी आभार प्रदर्शन केले.

समारंभ यशस्वी करण्यासाठी कलारंग संस्थेचे रितेश घासे, संदेश मयेकर, विशाल गोरड, विनोद म्हात्रे, किर्ती घासे, तन्वी पाटील आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.ही नाट्य स्पर्धा अलिबाग तालुका ग्रामीण विभागाकरिता मर्यादित आहे . मानकुले, खिडकी, चौल, नांगरवाडी, नारंगी, पेझारी, भोनंग, मेढेखार इत्यादी गावातील नाट्य मंडळांनी या नाट्य स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

## मेल, एक्स्प्रेस शेड्युलसाठी क्यूआर कोड सुविधा

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि पनवेल येथून सुटणाऱ्या मेल, एक्सप्रेस गाड्यांच्या वेळापत्रकासाठी क्यूआर कोड सुरू केला आहे.मध्य रेल्वे मुंबई विभागाने प्रवाशांना आवश्यक प्रवास तपशील जलद आणि सोयीस्करपणे उपलब्ध करून देण्यासाठी क्यूआर कोड-आधारित माहिती प्रणाली सुरु केली आहे. या नवीन उपक्रमाचा उद्देश साध्या स्कॅनद्वारे रिअल-टाइम माहितीसाठी विनाअडथळा सहज वापर करून प्रवासाचा अनुभव वाढवणे हा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) आणि पनवेल येथून निघणारे प्रवासी आता स्थानकांवर उपलब्ध असलेला क्यूआर कोड स्कॅन करून मेल/एक्सप्रेस गाड्यांसाठी ट्रेनचे वेळापत्रक, प्रवासी आरक्षण प्रणाली (पीआरएस) नियम, मार्ग नकाशा, मध्य रेल्वेचे अधिकृत संकेतस्थळ, तक्रार निवारण आणि मदतीसाठी रेलमदद पोर्टल आदी गोष्टी पाहू शकता. प्रवाशांच्या सोयीसाठी ही माहिती मराठी, इंग्रजी, हिंदी या तीन भाषांमध्ये उपलब्ध आहे.

## मामाच्या गावाला येणारी मुले आता फास्टफुड, मोबाईलमध्ये दंग

**तळा : प्रतिनिधी**

शाळांना उन्हाळी सुट्टी पडली की मुंबईकर चाकरमानी व मामाच्या गावालाभाचे मंडळी मोठ्या प्रमाणात येतात. आणि ग्रामिण डोंगराळ भागाची मजामोठ्या हौसेने घेतली जात होती मात्र कालपरत्वे मामाच्या गावातीलडोंगरचा रानमेवा खाण्यात दंग होणारी ही बच्चे कंपनी आता टफरीवरीलफास्टफुड , जंगफुड , चिप्स व मोबाईल वरील गेम या मध्येच अधिक गुंतलेलीअसतात.त्यातूनही ज्या मुलांना आवड आहे अशी मुले निसर्गाचा आनंद घेत असतात.

तळा तालुक्यात निसर्गाचा एक मोठा खजिना असून त्यातील रानमेवाहा एक एप्रिल , मे महिन्यात लहान मुलांसाठी व मुंबईतील चाकरमान्यासाठीपर्वणीचे दिवस असतात. लहान मुले सुट्टीत शहराकडून मामाच्या गावातीलडोंगरात जावून डोंगरची काळी मैना , आंबे , फणस , काजू , हाटूरण , जांभळलोगड्या आदि रानमेवा खावून आनंद घेत होती तसेच दुपारच्या वेळीगावाशेजारी असणाऱ्या तलाव , विहिरी अथवा नदीच्या डोहामध्ये पोहूनदुपारची वेळ निसर्गाच्या सानिध्यात घालवत असत यातून या बच्चे कंपनीलापोहण्यातून व्यायाम व फळांतून विविध जीवनसत्वे शरीराला मिळत होती.

त्यातच निसर्गाचा अनुभव मिळत होता तसेच शुद्ध हवा व वेगवेगळ्या प्रकारचीवृक्षांची कोवळी पाने चवीने चघळणे व विचारांची देवाण घेवाण शहर व गावयाची चांगली माहिती अनुभवता येत होती. त्या डोंगरच्या मेव्यापासूनवनऔषधी पासून आजची हि लहामुले दूर होत असल्याचे पहावयास मिळत आहेत

ग्रामीण भागात मोकळी मैदाने जंगल सपाटीकरण अशा भागात स्वच्छंदपणे ग्रामीण खेळ मोठ्या हौसेने या मैदानावर मुले खेळत होती. हे ग्रामिण खेळ तर दुरापास्त झाले आहेत ग्रामिण भागातील खेळ व रानमेवा खाण्याच्या फिरण्याच्या पध्दततीमुळे लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत होती .

## आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय स्पर्धा

# महाराष्ट्राचा संघ अजिंक्य




**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय हौशी जिम्नॉस्टिक्स असोसिएशनच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र हौशी जिम्नॉस्टिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित राष्ट्रीय आर्टिस्टिक जिम्नॉस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या वरिष्ठ गटात महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकाविले. अखेरच्या क्षणापर्यंत श्वास रोखायला लावणाऱ्या या लढतीत महाराष्ट्राने १२७.२५ गुणांनी सोनेरी यशाला गवसणी घातली. महिलांच्या वरिष्ठ गटातील असमांतर बार्स प्रकारात महाराष्ट्राच्या अनुष्का पाटील हिने कांस्यपदक जिंकले.

बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात शनिवारी (दि. ३) ही स्पर्धा झाली. महिलांच्या आर्टिस्टिक जिम्नॉस्टिक्समधील वरिष्ठ गटाच्या सांघिक प्रकारात महाराष्ट्राच्या मुलींनी थरारक लढतीत बाजी मारत सुवर्ण पदकाला गवसणी घातली. मुंबईच्या अनुष्का पाटील व इशिता रेवाळे, ठाण्याची सारा राऊळ, पुण्याची शताक्षी टक्के, छत्रपती संभाजीनगरची रिद्धी हत्तेकर व मुंबईची रुजुल घोडके यांनी महाराष्ट्राला हे सुवर्णयश मिळवून दिले.

स्पर्धेचा पदक वितरण समारंभ ऑलिम्पिकपटू दिपा कर्माकर व क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक सुधीर मोरे यांच्या हस्ते झाला. या वेळी महाराष्ट्र हौशी जिमनॅस्टिक संघटनेचे अध्यक्ष संजय शेटे, द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त विश्वेश्रर नंदी, मकरंद जोशी व स्पर्धा संचालक प्रवीण ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

रेल्वेला १२७ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पश्चिम बंगालने ११५.५५ गुण मिळवित कांस्यपदक जिंकले. महिलांच्या वरिष्ठ गटात असमांतर बार्स प्रकारात महाराष्ट्राच्या अनुष्का पाटील हिने ९.४३३ गुणांसह कांस्यपदक जिंकले. या प्रकारात रेल्वेच्या करिश्माचा करिश्मा बघायला मिळाला. तिने निर्विवाद वर्चस्वासह १०.५०० गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर आपला हक्क सांगितला. दिल्लीची स्नेहा तारियल रौप्यपदकाची मानकरी ठरली.

> **सर्वाधिक पदकांचा मान**
>
> *यजमान महाराष्ट्राने आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत दोन सुवर्णांसह सात रौप्य व सहा कांस्य अशी एकूण सर्वाधिक १५ पदकांची लयलूट केली, मात्र रेल्वेने चार सुवर्ण, सहा रौप्य व दोन कांस्य अशी एकूण १२ पदकांसह गुणतक्त्यात अव्वल स्थान मिळवित सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्राचा संघ सातव्या स्थानी राहिला.*

## राज्यस्तरीय युनिफाईड स्पर्धेत स्वस्तिक भोसलेला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय युनिफाईड स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालयातील स्वस्तिक सतिश भोसले या विद्यार्थ्याने सुवर्णपदक जिंकले आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मतिशचे अभिनंदन व कौतुक केले.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद आयोजित राज्यस्तरीय शालेय युनिफाईड स्पर्धा नातेपुते येथे झाली. या स्पर्धेत सीकेटी विद्यालयातील इयत्ता नववीचा स्वस्तिक भोसले याने १७ वर्षाखालील मुलांच्या ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले. त्याची आता राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण, क्रीडा शिक्षक अशोक पाटील, भरत जितेकर, प्रकाश रिसबूड, समिक्षा सतिश भोसले उपस्थित होते.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक



## ड्रग टेस्टमध्ये दोषी रबाडाचे निलंबन

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा अचानक आयपीएलमधून माघार घेऊन मायदेशी परतला, पण त्यामागचे कारण कळू शकलेले नव्हते. अखेर रबाडाने मायदेशी परतण्यामागचे मौन सोडले.

गुजरात टायटन्सकडून खेळणाऱ्या रबाडावर ड्रग्ज टेस्टमध्ये दोषी आढळल्यानंतर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यानंतर अचानक त्याला आयपीएल सोडून दक्षिण आफ्रिकेला परतावे लागले. रबाडाने आपली चूक मान्य करीत एक निवेदन जारी केले आहे. त्याला तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

## नागोठण्यात बाल मॅरेथॉन; विजेत्यांचा गौरव



**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स टाऊनशीप नागोठणे येथे श्री गावदेवी मुंढाणी आयोजित कबड्डी प्रशिक्षण शिबिर अंतर्गत बाल मॅरेथॉन घेण्यात आली. यातील सहा विजेत्यांना गौरविण्यात आले.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली जे.जे. पाटील आणि मंगेश नामदेव घासे (माजी सैनिक) यांच्या नेतृत्वात धावण्याची स्पर्धा शिहु ते रिलायन्स मैदान या मार्गावर घेण्यात आली. यामध्ये सुमारे १०० मुला-मुलींनी उत्साहाने सहभाग घेतला.

या स्पर्धेत पहिले सहा क्रमांक मिळवणाऱ्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यामध्ये मुलांत भाग्य कुथे प्रथम, हर्ष भोईर द्वितीय, शुभम माधवी तृतीय, आरुष घासे चतुर्थ, परेश म्हात्रे पाचवा व वेदांत भोईर सहावा यांचा समावेश आहे; तर मुलींमध्ये प्रियांशी भोईर प्रथम, नेत्रा कुथे द्वितीय, प्रिया बैकर तृतीय, सिद्धी कुथे चौथी, मयुरी भोईर पाचवी व अस्मिता लांगी सहावी आली

या वेळी माजी सैनिक कुमार कुथे, केतन भोईर, सैनिक स्वरूप कोकाट, राष्ट्रीय खेळाडू नितीन शेळके, राष्ट्रीय पंच विजय भोईर, जगदीश पाटील, शुभम शेळके, सुरेश कोकाटे, राकेश भोईर आदी उपस्थित होते.

## कर्जतच्या कुस्ती आखाड्यात कोल्हापूरचा अमर कदम अजिंक्य

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव अक्षय्य तृतीयेपासून सुरू झाला. त्या निमित्ताने शंभर वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती भिवंडीचा सागर डिंगोरे आणि कोल्हापूरचा अमर कदम यांच्यात रंगली. यात सागरला चीतपट करून अमर हा अजिंक्य ठरला, तर सावळे येथील विजय धुळे याने मानाची गदा मिळवली.

धापया आखाड्यात सकाळी ९ वाजल्यापासून स्थानिक स्थानिक कुस्तीगीरांमध्ये कुस्ती होऊन कुस्त्यांना प्रारंभ झाला.



धापया देवस्थान समितीचे अध्यक्ष गणेश शिंदे यांनी कुस्त्यांचा शुभारंभ केला, तर कर्जत तालुका कुस्तीगीर अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी ज्येष्ठ पंच मारुती ठाकरे, दीपक भुसारी, भाई आणेकर, महेंद्र चंदन, मनोज वरसोलीकर, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, वसंत पवार, व्यंकटेश ठाकरे, मलेश भोईर आदी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात ४२ आणि दुपारच्या सत्रात २८ अशा एकूण ७० कुस्त्या झाल्या. सकाळच्या सत्रात विजय धुळे विजेता ठरला. त्याला रोख पारितोषिक देण्यात आले आणि भगवान धुळे यांनी त्याला गदा देऊन सन्मानित केले. अंतिम कुस्ती कोल्हापूरच्या अमर कदमने भिवंडीच्या सागर डिंगोरेला मात देऊन जिंकली. शेवटच्या कुस्तीसाठी १३ हजार रुपयांचे पारितोषिक होते. धुळे यांनी आखाडा विजेता अमर यालासुद्धा गदा देऊन सन्मानित केले. दुपारच्या सत्रात महिलांच्या कुस्त्या झाल्या. त्यासुद्धा लक्ष वेधक ठरल्या. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, रमेश लोभी यांनी काम पाहिले. या वेळी १०३ वर्षांचे कुस्ती पंच मारुती ठाकरे यांचा तसेच दत्तात्रेय पालांडे, हरिश्चंद्र कांबेरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

## महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत एनआरआय संघ विजेता



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मनसे सीवूड्स विभागाच्या वतीने सेक्टर ४८ येथील गणेश मैदानात महिलांची डे-नाईट अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा रंगली. स्पर्धेत एनआरआय संघाने विजेतेपद पटकाविले.

एकूण १४ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. साखळी फेरीनुसार खेळवण्यात आलेल्या या स्पर्धेत अंतिम सामना एनआरआय विरुद्ध हेल्दी सुपर मॉम्स यांच्यात झाला. या अटीतटीच्या सामान्यात एनआरआय संघाने बाजी मारून आठव्या पर्वाच्या चषकावर आपले नाव कोरले. तृतीय क्रमांक श्री गुरुदत्त संघाने प्राप्त केला.




## गुजरातचा विजय; हैदराबादचे पॅकअप्

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या गुजरात टायटन्सने प्लेऑफच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. घरच्या मैदानावर झालेल्या सामन्यात गुजरातने सनरायझर्स हैदराबादवर ३८ धावांनी विजय साकारला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २२४ धावा केल्या होत्या. हैदराबादला १८६ धावाच करता आल्या.

हैदराबादकडून सलामीला फलंदाजी करताना हेड २० धावा करीत तंबूत परतला. अभिषेकने सर्वाधिक ७४ धावांची खेळी केली, ज्यात चार चौकार आणि सहा षटकारांचा समावेश होता.

तत्पूर्वी गुजरात टायटन्सकडून सलामीला आलेल्या शुभमन गिल आणि साई सुदर्शन दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ८७ धावा जोडल्या. यादरम्यान सुदर्शनने २३ चेंडूत ४८, तर गिलने ३८ चेंडूत ७६ धावांची खेळी केली. या दोघांनी पाया रचल्यानंतर शेवटी जोस बटलरने संघाची धावसंख्या २०० पार पोहचवली. बटलरने ३७ चेंडूत ६४ धावा चोपल्या.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com